# ज्ञान प्रबोधिनी

# शैक्षणिक उपक्रम संशोधिका

## वार्षिक वृत्त - शके १९४६-४७

## (सन २०२४-२५)















**विकासाच्या संधीची समानता, त्यासाठी शिक्षणातून सक्षमता**

भारतभरातील शहरी, नागरीवस्ती, ग्रामीण व आदिवासी भागात कृतिशिक्षण व सामाजिक सहभागाद्वारे शैक्षणिक प्रक्रिया जिवंत ठेवण्याचे काम



विकासमित्र पडसरे - हसत खेळत मुलभूत गणिती खेळ




प्रेरणा सेतू - दूरस्थ माध्यमातून करिअर मार्गदर्शन



छोटे सायंटिस्टस् - शिक्षक प्रशिक्षण, पाँडिचेरी



छोटे सायंटिस्टस् - शिक्षक प्रशिक्षण, चेन्नई



१० वी स्वयं - अध्ययन कार्यशाळा



समस्या परिहार स्पर्धा



ज्ञान सेतू - कट्टा



ज्ञान सेतू - मेळावा



गणित प्रभुत्व परीक्षा - बक्षीस समारंभ



LearnEng - विद्यार्थिनी 'क्रियापद' ही संकल्पना समजून घेताना



अनुभव शाळा - प्रजासत्ताक दिन कार्यक्रम



प्रज्ञा विकास - आकाश कंदील कार्यशाळा

# शैक्षणिक उपक्रम संशोधिका

## वार्षिक वृत्त - शके १९४६-४७ (सन २०२४-२०२५)

### मनोगत

ज्ञान प्रबोधिनीच्या औपचारिक शैक्षणिक रचनांमधील प्रयोगांचा देशभर विस्तार आणि विविध शैक्षणिक संस्थांतील शिक्षण प्रक्रिया समृद्ध करण्याच्या उद्देशाने शैक्षणिक उपक्रम संशोधिका विभाग कार्यरत आहे. ज्ञान प्रबोधिनीची 'मनुष्य घडणीची संकल्पना व प्रयोग' समाजाच्या विविध स्तरांपर्यंत पोचविण्याच्या उद्देशाने १९९२ साली या विभागाची स्थापना करण्यात आली.

संपूर्ण वर्षभरातील विविध उपक्रमांच्या माध्यमातून १५ राज्यांमधील १३४० शाळांमधील १७३४५० विद्यार्थ्यांपर्यंत पोचण्यात विभाग यशस्वी ठरला.

विविध उपक्रमांपैकी 'छोटे सायंटिस्ट्स्' या प्रकल्पातून दीड लाखांहून अधिक विद्यार्थ्यांपर्यंत पोचण्यात गटाला यश मिळाले आहे. एकूण १२ केंद्रांवर समस्या परिहार स्पर्धा व वैज्ञानिक कौशल्य अभिव्यक्ती स्पर्धांचे आयोजन करण्यात आले.

'अनुभव शाळा' प्रकल्पातून विद्यार्थ्यांमध्ये मूलभूत अध्ययन कौशल्यांत विशेष प्रगती दिसून आली. 'प्रज्ञा विकास' प्रकल्पात नव्यानेच नेतृत्व विकसन गटाची सुरुवात करण्यात आली.

'विकासमित्र वेल्हे-पानशेत' प्रकल्पात प्रथमच शिक्षणदूतांसाठी आणि दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी निवासी अभ्यास शिबिरांचे आयोजन करण्यात आले. 'विकासमित्र रोहा' प्रकल्पांतर्गत प्रथमच उन्हाळी शिबिरांसाठी संयोजक प्रशिक्षण वर्ग घेतला गेला आणि या वर्गातून प्रशिक्षण घेतलेल्या संयोजकांनी एकूण १० केंद्रांवर ५५४ विद्यार्थ्यांसाठी यशस्वीपणे शिबिरे घेतली. रायगड जिल्ह्यातील ग्रामीण भागात चालणारा इयत्ता दहावी स्वयंअध्ययन कौशल्य प्रशिक्षण कार्यक्रम विद्यार्थ्यांना स्वतःच्या अभ्यास प्रवासाची जबाबदारी घेण्यास, नियोजन करण्यास, योग्य अभ्यास पद्धती वापरण्यास व उद्दिष्ट ठरवण्यास उपयोगी ठरला.

विभागाकडून सलग दुसऱ्या वर्षी 'गणित प्रभुत्व परीक्षा'चे संयोजन करण्यात आले. यावर्षी १०५ शाळांतील २१९७ विद्यार्थी परीक्षेला उपस्थित राहिले, जे मागील वर्षीच्या तुलनेत जवळपास दुप्पट आहे.

'LearnEng' प्रकल्प वेल्हे भागातील ७ शाळांमध्ये नव्याने राबविला गेला. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये इंग्रजी भाषेतील आत्मविश्वास व स्वावलंबन निर्माण करण्याचा या प्रकल्पाचा हेतू होता.

'प्रेरणा सेतू' या प्रकल्पाद्वारे तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करत देशातील ७ राज्यांतील विद्यार्थी दूरस्थ माध्यमांतून जोडले गेले. विद्यार्थ्यांचा दृष्टिकोन व्यापक करण्यासाठी प्रकल्पात विविध क्षेत्रातील - उद्योजकता, प्रशासकीय सेवा, समाजकार्य, कृत्रिम बुद्धिमत्ता इत्यादींतील यशस्वी व्यक्तींशी ऑनलाईन सत्रांतून संवाद साधण्याची संधी विद्यार्थ्यांना मिळाली.

'ज्ञान सेतू' प्रकल्पाच्या माध्यमातून यावर्षी एकूण १० राज्यांतील ११४ शाळांमधील १२१७६ विद्यार्थ्यांपर्यंत १२७ महाविद्यालयीन स्वयंसेवक पोचले. मे मधील कार्यकर्ता प्रशिक्षण शिबिर आणि या कार्यात अखंड सहभागी होण्याची प्रतिज्ञा ग्रहणाचा कार्यक्रम या सर्व कामाला बळकटी देणारा ठरला.

या उपक्रमांमध्ये काम करत असताना KPIT Technologies, Bloom Combustion India Pvt. Ltd., भारत फोर्ज लिमिटेड, PolyOne Polymers (Avient), Bloom Combustion, EXCEL इंडस्ट्रीज लिमिटेड द्वारा श्री. स्वामी विवेकानंद रिसर्च अँड ट्रेनिंग इन्स्टिट्यूट (रोहा), AFCONS Ltd. मुंबई (शापूरजी पालनजी ग्रुप) या कंपन्यांकडून भरीव आर्थिक मदत मिळाली. या सर्व कामात विवेकानंद केंद्र, विद्याभारती, वनवासी कल्याण आश्रम, सेवा भारती, राष्ट्रोत्थान परिषद, महर्षी कर्वे स्त्री शिक्षण संस्था, महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी, छत्रपती शिक्षण मंडळ, कल्याण यासारख्या अनेक संस्था व संघटनांबरोबर काम करण्याची संधी मिळाली. विभागातर्फे सर्वांचे आभार व्यक्त करतो. या सर्व कामाचा वार्षिक अहवाल सादर करताना आनंद होतो आहे. प्रत्येक प्रकल्प वृत्तामधील QR code scan करून अधिकचे तपशील नक्की पहावेत.

'नव्या युगाचे पाईक आम्ही तारे नवक्षितिजावरचे निजरुधिराची आण वाहुनी रूप पालटू देशाचे!' हा दृढ आत्मविश्वास शिक्षणाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये जागृत करण्यासाठी आम्ही सर्वजण प्रयत्नशील आहोतच.

वर्षभरातील यशस्वी कामगिरीच्या पार्श्वभूमीवर पुढील शैक्षणिक वर्षात या सर्व प्रकल्पांचा भौगोलिक व संख्यात्मक विस्तार करण्याचा विभागाचा मानस आहे.

२०२५-२६ मधील कार्य संकल्प पूर्ण करण्यासाठी आपल्या सर्वांच्या सहभागाची आणि सहकार्याची आवश्यकता आहे. आपण यात आपला सहयोग देऊन मनुष्यघडणीच्या प्रक्रियेत सहभागी व्हावे ही विनंती.

**अमर परांजपे**
विभागप्रमुख

सस्नेह आपले,
**ओंकार बाणाईत, प्रकाश रणनवरे, पूर्वा धोकटे, ऋतुजा देशमुख, शुभंकर केळकर**

# अनुक्रमणिका



| अ.क्र. | प्रकल्पाचे नाव | पृष्ठ क्र. | अ.क्र. | प्रकल्पाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|---|---|
| १. | गणित प्रभुत्व परीक्षा | ३ | ८. | विकासमित्र – पडसरे | १७ |
| २. | अनुभव शाळा | ४ | ९. | स्वयंअध्ययन कौशल्य कार्यक्रम | १८ |
| ३. | LearnEng | ६ | १०. | प्रेरणा सेतू | १९ |
| ४. | विकासमित्र – वेल्हे, पानशेत | ८ | ११. | ज्ञान सेतू | २० |
| ५. | छोटे सायंटिस्ट्स् | १० | १२. | उन्हाळी शिबिरे – २०२५ | २३ |
| ६ | प्रज्ञा विकास | १४ | १३. | कार्यकर्ता प्रशिक्षण शिबिर – २०२४ | २४ |
| ७. | विकासमित्र – रोहा | १६ | १४. | पालक साहाय्यक गट | २४ |



# शैक्षणिक उपक्रम संशोधिका - रचना आणि संख्यात्मक आढावा

➢ **शैक्षणिक उपक्रम संशोधिका विभाग २०२४ –२५ या वर्षातील नियमित विद्यार्थी, शाळा व प्रकल्प गट आणि मार्गदर्शक यांचा संख्यात्मक आढावा खालीलप्रमाणे दिला आहे –**

| प्रकल्पाचे नाव | प्राथमिक (१ ते ४) | पूर्व प्राथमिक (५ ते ७) विद्यार्थी | माध्यमिक (८ ते १०) विद्यार्थी | शाळांची संख्या | प्रकल्प गट आणि मार्गदर्शक |
|---|---|---|---|---|---|
| गणित प्रभुत्व परीक्षा | – | १४०३ | ७९४ | १०५ | ७५ |
| अनुभव शाळा | १६१ | ५९ | – | – | १९ |
| LearnEng | – | २६६ | – | ७ | ३५ |
| विकासमित्र – वेल्हे, पानशेत | – | ११९६ | १२६४ | ४२ | ७६ |
| छोटे सायंटिस्ट्स् | – | ९८०७८ | ५५७५४ | १०१२ | ९८६ |
| प्रज्ञा विकास | – | – | २०१ | – | ४५ |
| विकासमित्र – रोहा | – | ७२० | – | ९ | ५ |
| विकासमित्र – पडसरे | – | १४९ | १४९ | १ | १५ |
| स्वयंअध्ययन कौशल्य | – | – | ९६५ | २७ | ८ |
| प्रेरणा सेतू | – | – | ११५ | २३ | २७ |
| ज्ञान सेतू | – | – | १२१७६ | ११४ | १२७ |
| **एकूण** | **१६१** | **१०१८७१** | **७१४१८** | **१३४०** | **१४१८** |
| **एकूण विद्यार्थी संख्या** | **१७३४५०** | | | | |

➢ **अन्य राज्य –**

| | |
|---|---|
| **छोटे सायंटिस्ट्स्** | **अरुणाचल प्रदेश, गुजरात, कर्नाटक, केरळ, तमिळनाडू, आंध्र प्रदेश, आसाम, गोवा** |
| **ज्ञान सेतू** | **आसाम, मेघालय, नागालँड, अरुणाचल प्रदेश, झारखंड, मध्यप्रदेश, ओडिशा, जम्मू आणि काश्मीर, बिहार** |
| **१५ राज्ये, १३४० शाळा, १४१८ प्रकल्प गट व मार्गदर्शक, १७३४५० विद्यार्थी** | |

# १. गणित प्रभुत्व परीक्षा - गणिताशी मैत्रीचा प्रवास



**गणिताचा अभ्यास - फक्त गुणांसाठी नाही, तर विचारक्षम, प्रयोगशील आणि उपयोजनक्षम पिढी घडवण्यासाठी. विचारांना चालना देणारे प्रश्न, गणित सखोल समजून घेण्याची संधी, स्पर्धा नव्हे तर एक शिक्षणप्रक्रिया ! ही या परीक्षेची वैशिष्ट्ये !**

''गणित म्हणजे प्रश्नांची उत्तरं नव्हे, तर उत्तरांमागची कारणं शोधण्याची प्रक्रिया आहे.'' गेली ४० वर्षे, पुणे जिल्हा गणित अध्यापक मंडळ याच दृष्टीकोनातून गणित प्राविण्य - प्रज्ञा/ प्रभुत्व परीक्षा घेत आहे - सातत्याने, चिकाटीने आणि एका ध्येयासाठी - विद्यार्थ्यांना विचारक बनवणे, हा यातला मुख्य हेतू.

२०२३ पासून विभाग केवळ परीक्षेचं संयोजन करत नाही, तर तिचं शैक्षणिक मूल्य अधिक प्रभावी कसं करता येईल, यासाठी सातत्याने प्रयत्न करत आहे.

आज, जेव्हा स्पर्धा परीक्षा म्हणजे बहुपर्यायी प्रश्नांची गर्दी वाटते, तेव्हा ही परीक्षा मूळ संकल्पनांवर आधारित विचारमंथन घडवते. येथे उत्तरापेक्षा विचार करण्याची पद्धत महत्त्वाची!

विद्यार्थ्यांनी केवळ प्रश्नांची उत्तरे दिली नाहीत, तर गणिताची नवी दृष्टी आत्मसात केली. ही परीक्षा म्हणजे एक वैचारिक वाटचाल होती - जिथे प्रत्येक प्रश्न विद्यार्थ्याला स्वतःच्या विचारविश्वात खोलवर डोकावण्याची संधी देत होता. आकड्यांच्या पलीकडे विचार, तर्क आणि समज वाढवणाऱ्या या प्रक्रियेला 'परीक्षा' म्हणणं ही मर्यादा ठरावी, इतकी ती अनुभवसमृद्ध होती.

२०२३-२४ पासून ज्ञान प्रबोधिनी शैक्षणिक उपक्रम संशोधिका या परीक्षेच्या आयोजनात सक्रियपणे सहभागी झाले आहे. या दुसऱ्या वर्षात संपूर्ण प्रक्रियेत ज्ञान प्रबोधिनीची खास झलक देण्याचा प्रयत्न करण्यात आला. गणितातील कौशल्यांची जाणीवपूर्वक जोपासना हा या उपक्रमाचा मुख्य हेतू असल्याने, इच्छुक विद्यार्थ्यांसाठी विशेष ऑनलाईन मार्गदर्शन सत्रांचे आयोजन करण्यात आले. **५वी आणि ८वी साठी स्वतंत्रपणे प्रत्येकी सुमारे ३३ सत्रे घेण्यात आली.** या सत्रांमुळे विद्यार्थ्यांमध्ये गणित विषयाची आवड वाढीस लागली आणि त्यांची विषयाशी नाळ जोडली गेली. **यंदाच्या वर्षी एकूण विद्यार्थ्यांचा सहभाग गेल्या वर्षीच्या तुलनेत जवळजवळ दुपटीने वाढला, ही या उपक्रमाची उल्लेखनीय बाब ठरली.**

**➢ गणित प्रभुत्व परीक्षा २०२४-२५ सहभागाचा आढावा -**

| दिनांक | कार्यक्रम | तपशील |
|---|---|---|
| १७ डिसेंबर २०२४ | पहिला टप्पा | १२ केंद्र इयत्ता ५ वी : १४०३ विद्यार्थी इयत्ता ८ वी : ७९४ विद्यार्थी<br>क्षेत्रे : पुणे, पिंपरी-चिंचवड, बारामती, इंदापूर, वेल्हे, पानशेत, भोर, मुळशी |
| १६ फेब्रुवारी २०२५ | दुसरा टप्पा | दुसऱ्या टप्प्यासाठी १३२ विद्यार्थी निवडले गेले. |
| १४ एप्रिल २०२५ | पारितोषिक वितरण समारंभ | डॉ. योगेश देशपांडे, व्हीआयआयटी पुणे यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला |

१३२ विद्यार्थ्यांनी पहिल्या टप्प्याच्या यशानंतर दुसऱ्या टप्प्याची वाट धरली. ही परीक्षा १६ फेब्रुवारी २०२५ रोजी झाली यात त्यांच्या आकलनाची सखोल पडताळणी झाली आणि त्याचा शेवट १४ एप्रिल २०२५ रोजी एका बक्षीस समारंभात झाला. डॉ. योगेश देशपांडे (व्हीआयआयटी, पुणे)यांच्या मार्गदर्शनाखाली ७० विद्यार्थ्यांना त्यांच्या प्रयत्नांसाठी रोख पारितोषिक, प्रशस्तीपत्र आणि गौरवचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले.

गणित प्रभुत्व परीक्षा चित्रफीत पाहण्यासाठी QR Code स्कॅन करून पहावा.

इंस्टाग्राम  फेसबुक

# २. अनुभव शाळा



**पुणे शहरातील नागरी वस्ती भागातील प्राथमिक शाळेत जाणाऱ्या ६ ते ११ वर्षे वयोगटातील विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी अभ्यासपूरक मार्गदर्शन, संस्कारमूल्य व कृतियुक्त शिक्षणासाठी अनुभव शाळा प्रकल्पाची सुरुवात केली आहे.**

पुणे शहरातील नागरी वस्ती भागात राहणाऱ्या वय वर्षे ६ ते ११ वयोगटातील मुलामुलींसाठी भारत फोर्जच्या अर्थसाहाय्याने २०१७-१८ पासून अनुभव शाळा प्रकल्प चालू आहे. नागरी वस्ती भागातील मुलामुलींना शिक्षणाची ओढ लागावी यासाठी प्रयत्न करणे, विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शारीरिक, मानसिक, बौद्धिक विकासावर भर दिला जातो. यासाठी विविध शैक्षणिक खेळ, हस्तकला, चित्रकला, गाणी, गोष्टी, खेळ, श्लोक पाठांतर इ. समावेश असतो. जीवन कौशल्ये, मूल्य संवर्धन यातून संस्कार दिले जातात. विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाची आवड निर्माण व्हावी व शालेय अभ्यासात गती वाढावी शाळेतील विविध स्पर्धांमधील सहभाग वाढावा आणि त्यांना विविध कलागुण दाखवण्याची संधी मिळावी, या हेतूने अभ्यासक्रमाची रचना केली आहे. पोषक आहाराच्या माध्यमातून आरोग्य संवर्धनाचा प्रयत्न केला जातो.

➢ **तासिका व उपस्थिती –** केशवनगर (गायरान वस्ती, कम्युनिटी सेंटर), हडपसर, कोथरूड, कोंढवा या केंद्रांवरती अभ्यासक्रमातील विविध विषयांवर आधारित ३५ मिनिटांच्या तासिका झाल्या. १ली ते ३री लहान गटाच्या आणि ४थी ते ६वी या मोठ्या गटाच्या प्रत्येकी २३३ तासिका झाल्या. साधारण १८३ विद्यार्थी नियमितपणे वर्षभर वर्गात सहभागी होते.

### ➢ गृहभेटी –

सहभागी विद्यार्थ्यांच्या घरी नियमितपणे साप्ताहिक गृहभेटी घेण्यात आल्या. या भेटी दरम्यान विद्यार्थ्यांची कौटुंबिक पार्श्वभूमी, पालकांचा व्यवसाय, तसेच घरातील एकूण आर्थिक परिस्थिती समजून घेण्याचा प्रयत्न केला. त्यासोबतच नियमित उपस्थित विद्यार्थ्यांच्या पालकांशी प्रत्यक्ष संवाद साधून, त्यांच्या मुलांच्या अभ्यासातील प्रगती, वाढलेली उपस्थिती, तसेच शालेय व सहशालेय उपक्रमांतील सहभागाबद्दल माहिती दिली.

### ➢ सकस आहार –

अनुभव शाळेत येणाऱ्या विद्यार्थ्यांना वर्गात सकस आणि पोषक आहार नियमितपणे दिला जातो. यामध्ये खारीक-खजूर सारखा सुकामेवा, लाडू, गूळ, खारे शेंगदाणे, फुटाणे, नारळ वडी, राजगिरा वडी अशा विविध आरोग्यदायी पदार्थांचा समावेश असतो. विद्यार्थ्यांना पोषणमूल्ययुक्त आहाराची सवय लागून त्यांच्या आरोग्यात सुधारणा व्हावी, या उद्देशाने सकस आहार जाणीवपूर्वक वर्गात दिला जातो. यामुळे विद्यार्थ्यांचे शारीरिक आरोग्य सुधारण्यास मदत झाली. तसेच शिक्षणाबरोबरच त्यांची मानसिक एकाग्रता आणि वर्गात येण्याचे सातत्य टिकवून ठेवण्यासही मोठा फायदा झाला.

### ➢ विद्यार्थ्यांचे आरोग्य –

दर तीन महिन्याला विद्यार्थ्यांचे वजन तपासण्यात आले. तसेच वर्षाच्या सुरुवातीला उंची मोजण्यात आली. विद्यार्थ्यांना तपासण्याकरिता स्थानिक प्राथमिक आरोग्य केंद्रातील आशाताईंनी भेट दिली.

### ➢ वर्षभरातील अन्य विशेष कार्यक्रम व पालक सहभाग –

**आषाढी एकादशी –** पालखी सोहळा, दहीहंडी उत्सव, स्वातंत्र्य दिन, प्रजासत्ताक दिन, रक्षाबंधन, गणेशोत्सव, नाताळ, भोंडला, बालदिन, दिवाळी फराळ, मकर संक्रांत इत्यादी सण साजरे केले. या विशेष कार्यक्रमांमध्ये पालक सक्रीयपणे सहभागी झाले. साप्ताहिक पालक भेटींमुळे पालकांशी संपर्क वाढला आणि त्यामुळे त्यांच्याशी चांगले नाते निर्माण झाले. या विश्वासाच्या वातावरणामुळे पालकांनी विशेष कार्यक्रमांमध्ये स्वयंस्फूर्तीने सहभाग घेतला आणि विविध उपक्रमांमध्ये मदतही केली.

### ➢ माता पालक मेळावा –

सर्व केंद्रावर माता-पालक मेळावा घेण्यात आला. पालक मेळाव्यामध्ये वर्गात घेण्यात येणाऱ्या उपक्रमांची माहिती सांगण्यात आली. शाळेतील अभ्यासक्रमाव्यतिरिक्त अन्य कौशल्य विद्यार्थ्यांना शिकवली. विद्यार्थ्यांनी बनवलेल्या वस्तू, अभ्यास केलेल्या हस्ताक्षरातील वह्या तसेच विद्यार्थ्यांच्या नोंदवह्या पालकांनी बघितल्या. मेळाव्याचा समारोप माता पालकांना हळदी कुंकू व तिळगुळ वाटप करून आणि शैक्षणिक विचारांचे पुस्तक भेट म्हणून देऊन करण्यात आला.

### ➢ उन्हाळी शिबिर –

विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होण्यासाठी नावीन्यपूर्ण कृतियुक्त उपक्रम, मजा घेत सलग करता यावेत या उद्देशाने २३ ते २७ एप्रिल २०२५ रोजी उन्हाळी शिबिराचे आयोजन केले होते.

शिबिरामध्ये काही प्रमुख सत्रे घेण्यासाठी ज्ञान प्रबोधिनी नवनगर विद्यालय, निगडी केंद्रातील ताई, ज्ञान प्रबोधिनी पालक गटातील ताई आल्यामुळे ही सत्रे अधिक आशयपूर्ण झाली. शिबिराच्या शेवटच्या दिवशी सर्व केंद्रांवरील विद्यार्थ्यांची सहल पेशवे ऊर्जा पार्क आणि सारसबाग येथे नेण्यात आली.

➢ **अनुभव शाळेतील विद्यार्थ्यांमध्ये झालेले बदल –**

विद्यार्थी नियमितपणे वर्गात उपस्थित राहतात. त्यांच्यात स्वच्छतेच्या चांगल्या सवयी विकसित झाल्या आहेत. मनाचे श्लोक, पसायदान, गणपती स्तोत्र, मारुती स्तोत्र, 'आई माझी गुरु', शुभं करोती यांचे पाठांतर तसेच इयत्तेनुसार पाढे पाठांतर केले आहेत. शाळेच्या वार्षिक परीक्षेमध्ये विद्यार्थ्यांनी चांगले गुण मिळवून यशस्वी कामगिरी केली. पालकांनीही विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीबाबत समाधान व्यक्त केले आहे. भाषा आणि गणित या विषयांतील मूलभूत क्षमता प्रत्येक इयत्तेतील विद्यार्थ्यांमध्ये योग्यप्रकारे विकसित झाल्या आहेत.

➢ **अनुभव शाळा प्रकल्प परिणाम –**

❊ **विद्यार्थ्यांमध्ये मूलभूत अध्ययन क्षमतांचा विकास झाला –**

तासिका व निरीक्षणांमधून विद्यार्थ्यांचे वाचन, लेखन व गणित कौशल्य विकसित झाले. तसेच दरमहा चार विषयांचे कार्यपत्रक (भाषा, गणित, इंग्रजी, परिसर अभ्यास) आणि चाचणी साठीची उपस्थिती यातून सहभाग वाढलेला दिसून आला.

❊ **मूल्य व संस्कारांचे संवर्धन –** विद्यार्थ्यांच्या वर्तनात सकारात्मक बदल दिसून आला – नम्रता, स्वच्छता, सहकार्य व जबाबदारी यांसारख्या मूल्यांची वाढ झाली.

❊ **जीवन व्यवहार कौशल्यांचा विकास –** उपक्रमांमधून सहभागी विद्यार्थ्यांनी संवाद, समस्या सोडवणे, गटकार्य यांसारखी जीवनकौशल्ये आत्मसात केली.

❊ **उन्हाळी शिबिरातून अनुभवाधारित शिक्षण –** विद्यार्थ्यांना विविध कलात्मक, शैक्षणिक व गटकार्य या उपक्रमांद्वारे अनुभवाधारित शिक्षणाची संधी मिळाली.

❊ **विद्यार्थ्यांच्या आरोग्यात सुधारणा झाली –** पूरक आहारामुळे विद्यार्थ्यांची पोषणस्थिती सुधारली व उपस्थितीत वाढ झाली.

❊ **पालकांचा सक्रीय सहभाग वाढला –** नियमितपणे साप्ताहिक गृहभेटी घेतल्याने बैठकींमध्ये पालकांचा सकारात्मक सहभाग दिसून आला. विशेष उपक्रमांमध्ये सक्रीय सहभाग वाढला. पालकांचा सहभाग वाढल्यामुळे शिक्षणाबाबत जाणीव आणि सकारात्मक दृष्टीकोन तयार झाला.

### मनोगत

अनुभव शाळा प्रकल्पांतर्गत गेले तीन वर्षे साहाय्यक शिक्षक म्हणून काम करण्याची संधी मला मिळाली आणि हा प्रवास माझ्यासाठी अत्यंत समृद्ध करणारा ठरला. पहिली ते सहावीच्या विद्यार्थ्यांना शिकवणे सुरुवातीला थोडे आव्हानात्मक वाटत होते, परंतु हळूहळू हे कार्य माझ्या आवडीचे बनले.

या वयोगटातील मुलांची योग्य प्रकारे जडणघडण होण्यासाठी प्रथम स्वतः शिकून, नंतर त्या ज्ञानाचा उपयोग करून त्यांच्या व्यक्तिमत्त्वात सकारात्मक बदल घडवून आणणे, हे अनुभवणे खूपच समाधानकारक होते. या प्रकल्पात काम करत असताना मी मुलांबरोबरच स्वतःही सतत शिकत आणि वाढत आहे, याची जाणीव मला नेहमीच होत राहते.

प्रकल्पांतर्गत घेतले जाणारे उपक्रम हे विद्यार्थ्यांना मुक्तपणे बोलण्याची, विचार मांडण्याची आणि सादरीकरणाची संधी देतात. त्यामुळे त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण होतो. मुलांची नवीन गोष्टी शिकण्याची उत्सुकता आणि त्यांचा सहभाग हे नेहमीच प्रेरणादायी असते. पालकांशी नियमित संपर्कात राहिल्यामुळे प्रत्येक उपक्रमात त्यांचा उत्स्फूर्त सहभाग मिळतो, हे विशेष उल्लेखनीय आहे.

**– सौ. माधुरी संदीप पवार**
केंद्रशिक्षिका,
जय भवानी नगर, कोथरूड

❊❊❊

इंस्टाग्राम फेसबुक

**अनुभव शाळा प्रजासत्ताक दिन चित्रफीत**



# ३. LearnEng





ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना इंग्रजी भाषेमध्ये स्वावलंबी बनविणे, महाविद्यालयीन आणि उच्चशिक्षण घेण्यासाठी आत्मविश्वास निर्माण करणे तसेच जागतिकीकरणाच्या युगात लागणारी भाषा आणि जीवन कौशल्ये शालेय जीवनापासून विकसित करणे हा LearnEng प्रकल्पाचा हेतू! यासाठी इंग्रजीची भीती कमी होण्यासाठी सोप्या पद्धतीने शिकविणे, विविध जीवन कौशल्ये विकसित करून विद्यार्थ्यांतील आत्मविश्वास वाढविणे, गुणवत्तापूर्ण दैनंदिन कृतिपर तास, स्थानिक प्रशिक्षित शिक्षणदूत आणि त्यांचे क्षमता विकसन व विद्यार्थ्यांचे सातत्याने केलेले मूल्यमापन ही या प्रकल्पाची प्रमुख वैशिष्ट्ये!

शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये सुरू झालेला हा प्रकल्प पुणे जिल्ह्यातील वेल्हे व पानशेत भागातील ७ शाळांत इयत्ता ६ वी व ७ वीच्या २६६ विद्यार्थ्यांसाठी सुरु करण्यात आला. ज्ञान प्रबोधिनी शैक्षणिक उपक्रम संशोधिका व देशपांडे फाऊंडेशन हुबळी, कर्नाटक यांच्या संयुक्त विद्यमाने चालविल्या जाणाऱ्या या प्रकल्पास श्री. किशोर पाटील यांच्याकडून आर्थिक सहकार्य लाभले. दैनंदिन कृतिपर तासिका, परिस्थितीनुरूप उदाहरणे, वयोगटानुसार योग्य आशय, परस्परसंवादातून परिणामकारक शिक्षण आणि गुणवत्तापूर्ण प्रशिक्षण हे या प्रकल्पातील मुख्य घटक आहेत.

प्रकल्पात इंग्रजी भाषा तसेच जीवन कौशल्यावर आधारित दररोज ६० मिनिटांच्या तासिकेत ६ वी तील १४३ व ७ वी तील १२३ विद्यार्थ्यांसाठी अनुक्रमे १२०० व १०१५ असे Level १ व Level २ या रचनेतून तास घेतले.

**➢ आशय –**

**१. इंग्रजी भाषा कौशल्य विकसन –**

**❋ Bridge content –** वर्गातील सर्व मुलांना समान पातळीवर आणण्यास मदत झाली. मुख्य आशयापूर्वी २० दिवस हे घेण्यात आले.

**❋ वाचन कौशल्ये –** अक्षर ओळख, त्यांचे उच्चार, शब्दसंपत्ती वाढविणे, वाचन सराव

**❋ संवाद व लेखन कौशल्ये –** Parts of speech, Tenses.

**❋ शैक्षणिक साधने –** वाचन, संवाद, श्रवण कौशल्ये, पूरक खेळ, कृती, गाणी, वाचन कृती, वक्तृत्व व लेखन सराव, उजळणी.

**२. जीवन कौशल्ये विकसन –** Self-awareness, Critical thinking, Creative thinking, Empathy, Teamwork, Leadership skills

**३. सामाजिक जाणीव विकसन –** मुलांना समजतील असे विविध गावपातळी तसेच जीवनकौशल्य निगडीत प्रश्नांवर मातृभाषेतून गटचर्चा.

**➢ प्रकल्पातील प्रमुख घटक –**

**❋ निवासी प्रशिक्षण –** निवडक १३ शिक्षणदूतांचे देशपांडे फाऊंडेशन हुबळी, कर्नाटक येथे २० दिवस निवासी प्रशिक्षण घेण्यात आले. कृतीपर तासिका अध्यापन पद्धती, वर्ग व्यवस्थापन त्याच बरोबर तांत्रिक रचना याचा समावेश प्रशिक्षणात होता.

**❋ मासिक प्रशिक्षणे –** वर्षभरातील प्रशिक्षणातून तासांची सातत्यपूर्ण गुणवत्ता राखणे शक्य झाले. यातील आढाव्यातून शिक्षणदूतांना तास घेण्यातील अडचणी, अनुपस्थिती कारण - उपाय याबाबत विचार झाले तसेच शिक्षणदूतांचा सहभाग वाढला.

**❋ दैनंदिन तासिका –** शाळेच्या आधी दररोज ६० मिनिटे खेळ आणि कृतिपर तास घेतल्यामुळे आशय व अध्यायनातील सातत्य राखले गेले.

**❋ मूल्यमापन –** वर्षाच्या सुरुवातीची पूर्व चाचणी व वर्षअखेरीस घेतलेली उत्तर चाचणी, तसेच मासिक चाचणी यातून प्रकल्पाचा परिणाम मोजला.

**❋ शिक्षणदूत क्षमता विकसन –** नियमित इंग्रजी सरावाकरीता विविध Apps चा वापर, इंग्रजीतून संवाद, पुस्तक वाचन,

इंग्रजीतून रोजनिशी लेखन अशा कृती करून घेण्यात आल्या.

**✲ पालक सभा –** पालकांना प्रकल्पाची सविस्तर माहिती देऊन त्यांचा जबाबदारीपूर्ण सहभाग वाढावा तसेच मुलांची उपस्थिती कायम रहावी यासाठी पालक सभा घेतल्या. नियमित संपर्कासाठी गृहभेटी, Whatspp गट करण्यात आले.

**✲ उन्हाळी वर्ग –** मे महिन्याच्या सुट्टीत इंग्रजी सरावात खंड पडू नये तसेच विद्यार्थ्यात इतर कौशल्ये विकसित व्हावी यासाठी सलग १० दिवस दररोज २ तास वर्ग घेण्यात आले. एकूण ७ गावात घेण्यात आलेल्या या वर्गात १२५ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. यामध्ये खेळातून इंग्रजी, कला शिक्षण, गावातील पोस्ट ऑफिस तसेच ग्रामपंचायत यांना भेटी यातून अनुभव शिक्षण देण्यात आले.

**➢ प्रकल्प परिणाम –**

✲ या प्रकल्पाअंतर्गत असलेल्या ७ शाळांतील १३ वर्गात वर्षभरात प्रत्येकी सरासरी १६५ तास घेण्यात आले. कृति तासिकांचा परिणाम म्हणून विद्यार्थ्यांना इंग्रजी सूचना व आशय समजू लागला असे जाणवले. तसेच इंग्रजी शिकण्यात विद्यार्थ्यांचा उत्साही सहभाग वाढला. शाळेतील इंग्रजी शिक्षकांचा अनुकूल प्रतिसाद मिळाला. विद्यार्थ्यांचे इंग्रजीतील संवाद, वाचन तसेच लेखन कौशल्य वाढल्याचे मूल्यमापनातून जाणवले. विद्यार्थ्यात जीवन कौशल्ये तसेच सामाजिक जाणीव विकसनासाठी विविध गावपातळी तसेच जीवनकौशल्य निगडीत प्रश्नांवर मातृभाषेतून चर्चा घडविल्याचा उपयोग झाला.

✲ निवडक १३ शिक्षणदूत युवतींमध्ये गुणवत्तापूर्ण प्रशिक्षण, रोज इंग्रजीतून तास व नियमित आढावा घेतल्याने भाषा कौशल्ये आणि आत्मविश्वासात वाढ झाली. याचबरोबर नेतृत्वगुण, समस्या परिहार, निर्णय व संवाद कौशल्य यांचाही विकास झाला.

✲ मासिक प्रशिक्षणाद्वारे प्रकल्पात सर्वांचा जबाबदारीपूर्ण सहभाग वाढविण्यास मदत झाली. समस्या सोडविण्याचा अनुभव तसेच आयत्या वेळी परिस्थितीनुसार निर्णय घेण्याचे गटाचे कौशल्य वाढले.

✲ दैनंदिन प्रगतीमधील वाढ लक्षात आली. जीवन कौशल्ये रुजविण्यासाठी ताई-दादांचा विद्यार्थ्यांबरोबरचा रोजचा संवाद उपयोगी पडला.

✲ गुणवत्ता पूर्ण तास घेण्याबरोबरच एकत्र सहवासातून शिकणे, व्यक्ती म्हणून समजून घेणे, काम करण्याची प्रेरणा जागृती तसेच रोजची उपासना आणि वाचन यातून शिक्षणदूतांना प्रबोधिनी समजण्यासदेखील हे प्रशिक्षण महत्त्वाचे ठरले.

## मनोगत

प्रकल्पात काम करत असताना इंग्रजीमधून तास घेणे, नेतृत्व करणे, गटात काम करणे या गोष्टी मी नव्याने शिकले याचबरोबर अनुभवी व्यक्तींशी भेट आणि विचारांची देवाणघेवाण यातूनही नवीन गोष्टी शिकायला मिळाल्या. माझ्याच गावातील शाळेत तासिका घेतल्याने गावातील परिस्थिती समजली. त्याबरोबरच एक नवी ओळख निर्माण झाली. माझ्यातील गुणांना वाव, इंग्रजीतील सुधारणा, आत्मविश्वासातील वाढ हे मला झालेले फायदे! एकमेकांकडून नवीन गोष्टी शिकण्यासाठी मासिक प्रशिक्षण खूप महत्त्वाचे असते.

प्रकल्पाच्या सुरुवातीचे हुबळीचे २२ दिवसांचे प्रशिक्षण म्हणजे आमच्या सगळ्यांच्या आयुष्यातील सर्वात महत्त्वाचा भाग आहे. ते सगळ्यांसाठीच खूप नवीन होतं. पहिल्यांदाच राज्याबाहेर जाऊन नवीन भाषा, नवीन माणसे, वेगळी संस्कृती आम्ही अनुभवली आणि तिथूनच आमच्या Englishच्या प्रवासाची आणि नवीन आयुष्याची सुरवात झाली. यामुळे शिक्षणदूतांना नवीन संधी मिळाली आणि त्यांच्या वैयक्तिक आयुष्यात त्यांना खूप फायदा झाला. प्रबोधिनीमुळे आम्हाला समाज समजला. आपण समाजाचे देणे लागतो हे समजून कामाची प्रेरणा मिळाली. शाळेतील विद्यार्थी जेव्हा ''ताई, तू छान शिकवतेस सांगतात तेव्हा काम केल्याचे समाधान मिळते.''

मुलांना फक्त पुस्तकातून न शिकवता कृतीतून कस शिकवायचं ते समजलं. शाळेत तासिका घेत असताना पालकांशी खूप छान संवाद व्हायचा आणि त्यामुळे मुलांशी छान मैत्रीपूर्ण संबंध निर्माण झाले. विद्यार्थी वर्गात आवडीने येतात ही आम्हाला प्रेरणा देणारी गोष्ट आहे. याचा फायदा मुलांना नक्कीच भविष्यात होईल आणि ती समाजासाठी काम करतील. यातून प्रबोधिनीचे एक छान वाक्य आहे ''रूप पालटू देशाचे'' ते नक्कीच सत्यात येईल. यापुढेही मला हे काम करत रहायचे आहे. या कामात मिळणारा आनंद आणि समाधान वेगळे आहे.

**– प्राची निवंगुणे,** शिक्षणदूत



क्षणचित्रे

# ४. विकासमित्र - वेल्हे, पानशेत



ग्रामीण भागातल्या मुलांना गुणवत्तापूर्ण शैक्षणिक निवेश मिळावेत हा या प्रकल्पाचा हेतू. अभ्यास कौशल्य, विज्ञान कौशल्य, व्यक्तिमत्व विकसन कौशल्य व राष्ट्रीय जाणीव अशी यासाठीची ठरवलेली चौकट. प्रज्ञा विकास कार्यक्रमात जास्त क्षमतावान विद्यार्थ्यांपर्यंत नेतृत्व गुण विकसन, गट बांधणी कौशल्य पोहोचवणे हे उद्दिष्ट. ग्रामीण भागातील शालेय विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी अनुभव शिक्षणाद्वारे कौशल्य संवर्धन करणे व विद्यार्थ्यांना देशस्थितीची जाणीव करून देणे हे प्रकल्पाचे वैशिष्ट्य!

'विकासमित्र' प्रकल्प हा सन २०१९ पासून वेल्हे तालुक्यात ज्ञान प्रबोधिनीच्या शैक्षणिक उपक्रम संशोधिकेच्या मार्फत चालवला जात आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शैक्षणिक निवेश देणे व उत्तम शैक्षणिक वातावरण वेल्हे भागात तयार करणे हा या प्रकल्पामागील हेतू आहे. यावर्षी देखील प्रकल्पाचे काम परिणामकारक झाले. PolyOne Polymers (Avient) कंपनी, Bloom Combustion कंपनी व श्री. किशोर पाटील यांचे आर्थिक सहकार्य या प्रकल्पास लाभले. टप्पा २ मध्ये या प्रकल्पाच्या माध्यमातून अभ्यास कौशल्य, विज्ञान कौशल्य, व्यक्तिमत्त्व विकसन आणि राष्ट्रीय जाणीव असे विषय घेऊन काम झाले.

वर्षभरात प्रकल्पाच्या माध्यमातून नियमित साप्ताहिक विकासिका घेण्यात आल्या. तसेच चाचणीच्या आधारे निवडून घेतलेल्या २५० विद्यार्थ्यांसाठी प्रज्ञा विकास कार्यक्रमाची योजना करण्यात आली. याशिवाय शिक्षणदूत निवासी प्रशिक्षण, विविध स्पर्धा आणि काही विशेष उपक्रम योजण्यात आले.

### ➢ शाळा पातळीवर विकासिका –

प्रकल्पात ४२ शाळांमध्ये नियोजित अभ्यासक्रमातील विविध विषयांवर आधारित दीड तासांच्या २४६० विकासिका झाल्या. यात २४६० विद्यार्थी सहभागी होते.

| भाग | शाळा | वर्ग | विद्यार्थी | विकासिका |
|---|---|---|---|---|
| वेल्हा भाग | २८ | ३५ | ७५९ | १०५० |
| पानशेत भाग | १४ | ४७ | १७०१ | १४१० |

| मुख्य विषय | प्राथमिक घटक | माध्यमिक घटक |
|---|---|---|
| नियमित - अभ्यास कौशल्य | गणित, अभ्यास पायऱ्या, श्रुतलेखन, श्रवण, वाचन, स्मरण | लेखन, वाचन, अभ्यास पायऱ्या, नकाशा वाचन |
| विज्ञान कौशल्य | निरीक्षण, प्रश्न, मापन, वर्गीकरण, विश्लेषण, आकलन, परिसर अभ्यास | त्रिमिती, विज्ञान (भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र), आकलन+विचार |
| व्यक्तिमत्त्व विकसन | स्पर्धा, कला, ओळख स्पर्शाची, स्व-जाणीव, शारीरिक विकसन, मानसिक विकसन, सामाजिक विकसन | शारीरिक विकसन, मानसिक विकसन, भावनिक विकसन (ओळख) |
| नव्याने भर- राष्ट्रीय जाणीव | देशप्रश्न, संस्कृती ओळख-स्वदेशी, भारत समजून घेताना | देशप्रश्न, संस्कृती ओळख-लोकशाही, निवडणुका, प्रश्न समजून घेणे. |

### ➢ शिक्षणदूत प्रशिक्षण वर्ग–

#### ❋ प्राथमिक गट शिक्षणदूत प्रशिक्षण–

प्राथमिक गटासाठी काम करणाऱ्या वेल्हे तालुक्यातील त्या त्या गावात राहणाऱ्या अशा ३० युवतींचा गट होता. या गटापैकी १५-१७ जणींनी नियमितपणे वर्षभर काम केले. त्यांच्यासाठी फक्त प्रकल्पातील आशय न पोहोचवता अध्यापन पद्धती व व्यक्तिमत्त्व विकसनासाठीही विशेष सत्रांचे नियोजन केले होते. अशी एकूण १२ प्रशिक्षणं झाली.

#### ❋ माध्यमिक गट शिक्षणदूत प्रशिक्षण–

माध्यमिक शाळांमध्ये साप्ताहिक तासिका घेण्यासाठी प्रबोधिनीच्या स्पर्धा परीक्षा केंद्रात अभ्यास करणारा असा भावी अधिकाऱ्यांचा व महाविद्यालयीन युवक-युवतींचा गट होता.

➤ **शिक्षणदूत सहाध्याय दिन सहल –**

२७ आणि २८ डिसेंबर २०२४ रोजी या ग्रामीण शिक्षणदूतांसाठी एक अभ्यास दौरा आयोजित करण्यात आला होता. यात ३० शिक्षणदूत सहभागी झाले होते. वाई, प्रतापगड व सज्जनगड, सातारा येथील छत्रपती शिवाजी महाराज संग्रहालय आणि संगम माहुली नावाच्या ठिकाणाला भेट दिली.

➤ **विद्यार्थ्यांसाठीचे साहित्य –**

या शैक्षणिक वर्षात प्रकल्पाअंतर्गत मुलांना वाचन व निरीक्षण कृतिपुस्तिका, राखी बनवण्याचे साहित्य, पणती व पणत्या रंगवण्याचे साहित्य, विज्ञान प्रयोगाचे साहित्य, छात्र प्रबोधन अंक, सौर दिनदर्शिका आणि कार्डशीट देण्यात आले. तसेच सर्व शाळांत गणित संच देण्यात आले.

➤ **शिक्षणदूत –**

विकासमित्र प्रकल्पात विद्यार्थ्यांसोबत ग्रामीण भागातल्या मुली/महिला यांच्यासोबत देखील महत्त्वाचे काम केले जाते. ज्या ठिकाणी अनेक घरांमध्ये महिलेला मोकळेपणाने बोलता देखील येत नाही अशा ठिकाणी आपल्याकडे येणाऱ्या सगळ्या ताई मात्र आत्मविश्वासाने विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतात. अनेक ताई आपल्यासोबत ४-५ वर्षे देखील काम करत आहेत. अनेकजणी स्वतःचे शिक्षण सांभाळून हे काम करत आहेत. या कामामुळे या सर्वांना त्यांच्या ठिकाणी प्रतिष्ठेने वावरता येते. तसेच अनेक शाळांमध्ये त्यांना शिक्षकांनी हक्काने मदतीला देखील बोलावले. विकासमित्र मध्ये काम करता करता या ताईंचा व्यक्तिविकास देखील उत्तम झाला.

आज घडीला अशा काम करणाऱ्या ३० ताई आहेत. ५-६ जणी यापूर्वी विद्यार्थिनी म्हणून प्रकल्पाशी जोडल्या. आता शिक्षणदूत म्हणून काम केले.

त्या त्या गावातील शैक्षणिक वातावरण उन्नत करण्याच्या या प्रकल्पात या शिक्षणदूत ताई उत्तम सहभागी होतानाच त्यांच्या वैयक्तिक आयुष्यात देखील उन्नती करताना दिसल्या.

➤ **स्पर्धा –**

ह्या वर्षी इयत्ता ५ वी ते ७ वी च्या वर्षभरात २ प्रकारच्या स्पर्धा घेण्यात आल्या. मैदानावरती धावण्याच्या विविध स्पर्धा घेण्यात आल्या. मार्चमध्ये झालेल्या दुसऱ्या स्पर्धेत वर्षभरात आतापर्यंत शिकवलेल्या कौशल्यांवर आधारित प्रश्नमंजुषा स्पर्धेत मुलांनी खूप छान सहभाग घेतला.

➤ **प्रज्ञा विकास कार्यक्रम –**

तालुक्यातील प्रज्ञावान विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास व्हावा, त्या विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जाणीव संवर्धन व्हावे, नेतृत्वगुण वाढावेत तसेच या प्रशिक्षणाच्या आधारे आपल्या शाळेत विकासिकेच्या गुणवत्ता वाढीसाठी पुढाकार घ्यावा. यासाठी हा कार्यक्रम साधारण २५० विद्यार्थ्यांसाठी घेण्यात आला. या कार्यक्रमांतर्गत विद्यार्थ्यांसाठी वेल्हे व पानशेत भागात प्राथमिक व माध्यमिक गटासाठी स्वतंत्रपणे एकूण १२ कार्यशाळांचे आयोजन करण्यात आले.

➤ **विकासमित्र ( प्रज्ञा विकास उपक्रम )**

ग्रामीण भागातील प्रज्ञावान विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास व्हावा, त्या विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जाणीव संवर्धन व्हावे, नेतृत्वगुण वाढावेत यासाठी प्रज्ञा विकास हा उपक्रम आयोजित केला गेला.

निवडक विद्यार्थ्यांच्या प्राथमिक आणि माध्यमिक गटासाठी स्वतंत्रपणे एकूण १२ कार्यशाळांचे आयोजन करण्यात आले. या कार्यशाळांना तज्ज्ञ मार्गदर्शकांनी मार्गदर्शन केले. तसेच प्रत्येक कार्यशाळेत प्राथमिक व माध्यमिक करिता स्वतंत्रपणे गणित, मराठी, बुद्धिमत्ता, इंग्रजी, गटकार्य, संघकार्य, इंद्रिय संयमन, युक्तहार विहार, निरीक्षण कौशल्य अशी विविध सत्रे घेण्यात आली.

यावर्षी पहिल्यांदाच इयत्ता १०वीच्या विद्यार्थ्यांसाठी ज्ञान प्रबोधिनी वेल्हे वास्तू येथे दोन दिवसीय निवासी अभ्यास शिबिर घेण्यात आले. तसेच त्या विद्यार्थ्यांची परीक्षा झाल्यानंतर त्यांच्यासाठी एक दिवसीय सहल आयोजित करण्यात आली.

इयत्ता ८वीच्या विद्यार्थ्यांसाठी ज्ञान प्रबोधिनी निगडी येथे दोन दिवसीय निवासी अभ्यास शिबिर घेण्यात आले. ५ वी च्या इयत्तेसाठी एक दिवसीय सहलीचे आयोजन करण्यात आले त्यामध्ये पर्वती दर्शन, ज्ञान प्रबोधिनीमध्ये 'पावनखिंड' चित्रपट दाखवून त्यावर चर्चा घेण्यात आली व स्किल सिंक (केक बनवणे स्पर्धा) घेण्यात आली.



विकासमित्र सहल – इंस्टाग्राम चित्रफीत

विकासमित्र प्रकल्पाची क्षणचित्रे

# ५. छोटे सायंटिस्टस्



**वैज्ञानिक खेळण्यांच्या, कृतींच्या माध्यमातून सहज उपलब्ध साहित्याचा वापर करून सोप्या पद्धतीने विज्ञानाची आवड निर्माण करण्यासाठी कृतियुक्त विज्ञानाची शालेय विद्यार्थ्यांसाठी तासिका.**

छोटे सायंटिस्टस् हा प्रकल्प विद्यार्थ्यांच्या वैज्ञानिक संकल्पना आणि कौशल्यांची समज वाढवण्यासाठी, प्रयोगाधारित आणि प्रत्यक्ष कृती शिक्षणाचा वापर करून राबविला जातो. या प्रकल्पात विद्यार्थी स्वस्त, सहज उपलब्ध साहित्य वापरून सोप्या कृतींच्या आधारे वैज्ञानिक संकल्पना आणि कौशल्ये तासिकांच्या माध्यमातून शिकतात. तासिकांमध्ये आवर्जून घेतल्या जाणाऱ्या चर्चा ह्या पुस्तकी विज्ञान दैनंदिन जीवनातील अनुभवांशी प्रत्यक्ष जोडायला मदत होण्याच्या दृष्टीने आवर्जून योजल्या जातात.

### ➤ उद्दिष्टे –

प्रकल्पाचे मुख्य उद्दिष्ट म्हणजे चौकशी आधारित शिक्षणपद्धतीचा वापर करून विद्यार्थ्यांमध्ये विज्ञान विषयातील संकल्पनांची सखोल समज निर्माण करणे. प्रत्येक विद्यार्थ्याने प्रत्यक्ष कृतीच्या माध्यमातून अनुभव घेऊन केवळ वाचून नव्हे, तर कृती करून शिकावे असा यामागचा विचार. यातून विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित व्हावा आणि विचार करण्याची सवय निर्माण व्हावी. तसेच ह्या उपक्रमातून विद्यार्थ्यांना पुस्तकी ज्ञानाचा वापर त्यांच्या दैनंदिन जीवनातील समस्यांमध्ये कसा करता येतो हे समजून घेण्यास प्रवृत्त करणे. या सर्व उद्दिष्टांच्या माध्यमातून विज्ञान शिक्षण अधिक रंजक अनुभवसंपन्न आणि प्रभावी व्हावे यासाठी हा प्रयत्न.

### ➤ रचना –

भारतातील इयत्ता ५वी ते ९वी मधील विद्यार्थ्यांसाठी ३ मॉड्यूलच्या माध्यमातून राबविला. त्याचे तपशील पुढीलप्रमाणे–

| मॉड्यूल | विद्यार्थी गट | अभ्यासक्रम | विद्यार्थी संख्या | भौगोलिक क्षेत्रे |
|---|---|---|---|---|
| मॉड्यूल १ | ५ वी ते ७ वी | निरीक्षण, प्रश्न, मापन, वर्गीकरण, अभ्यास आणि प्रयोग रचना या ५ वैज्ञानिक कौशल्यांच्या विकासासाठी त्रिस्तरीय रचना | ६२,८१८ | महाराष्ट्र – पुणे, अहिल्यानगर, सातारा, सांगली, कोल्हापूर, नवी मुंबई, लातूर, मुंबई, कल्याण, रायगड, यवतमाळ, धाराशिव, सोलापूर |
| मॉड्यूल २ | ८ वी ते ९ वी | प्रत्येक इयत्तेसाठी ६ संकल्पना उदा. दाब, ध्वनी, बल, गती आणि दैनंदिन जीवनातील रसायनशास्त्र इ. | ५५,७५४ | |
| मॉड्यूल ३ | ६ वी ते ८ वी | राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार शालेय अभ्यासक्रमात संकल्पना अध्ययनाला विज्ञान कौशल्याची जोड | ३५,२६० | अन्य राज्ये – अरुणाचल प्रदेश, गुजरात, कर्नाटक, केरळ, तमिळनाडू, आंध्रप्रदेश, आसाम, गोवा |

विद्यार्थी प्रतिसाद

शिक्षक अभिप्राय

डॉ. होमी भाभा मार्गदर्शन वर्ग पालक–अभिप्राय

➢ **कार्यपद्धत –** शिक्षणाची गुणवत्ता राखत प्रकल्पाचा विस्तार करताना प्रकल्पाची खालीलप्रमाणे ३ मॉडेलची रचना केली.

| मॉडेल क्र. | कोणामार्फत | कसे | विद्यार्थी संख्या |
|---|---|---|---|
| मॉडेल १ | प्रशिक्षित शिक्षक | शिक्षकांना संकल्पना, कौशल्ये आणि कृतियुक्त अध्ययन-अध्यापनासाठी पूरक तंत्र यांचे प्रशिक्षण आणि साहित्य संच पिशवी दिली जाते. शिक्षक नियोजनपूर्वक जोडतासिका घेतात. | १,१७,६९८ |
| मॉडेल २ | विज्ञानदूत (ज्ञान प्रबोधिनी नियुक्त) | विज्ञानदूत विविध शाळांमध्ये जोडतासिका घेतात. | ३४,०६९ |
| मॉडेल ३ | स्वयंसेवक (महाविद्यालय, कॉर्पोरेट व स्वयंसेवी संस्था) | प्रशिक्षित महाविद्यालयीन विद्यार्थी, कॉर्पोरेट कर्मचाऱ्यांचे (उदा. KPIT) व स्वयंसेवी संस्थांचे सदस्य जोडतासिका घेतात. यात संरचित इंटर्नशिप व प्रमाणपत्राचा समावेश आहे. | २,०६५ |
| **एकूण विद्यार्थी संख्या – १५३८३२** | | | |

➢ **प्रशिक्षण पद्धती –**

प्रकल्पाचा विस्तार हेतू समोर ठेवून कृतियुक्त विज्ञानाचे तास हे जास्तीत जास्त विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचावे या दृष्टीने शिक्षक, विज्ञान दूत, स्वयंसेवक यांचे पूरक असे प्रशिक्षण घेण्यात आले. प्रशिक्षणादरम्यान कृती स्वत: करून बघणे, संकल्पना / कौशल्ये शिकवण्याची पद्धत, चर्चा करत शिकणे, तासांचे नियोजन, साहित्य संच ओळख इ. गोष्टी घेण्यात आल्या. शिक्षकांना लगेच तास घेता यावेत यासाठी प्रशिक्षणात शेवटी विद्यार्थी संख्येप्रमाणे साहित्य देण्यात आले.

❋ **शिक्षक प्रशिक्षण –**

महाराष्ट्रातील तसेच अन्य राज्यातील विज्ञान शिक्षकांना प्रशिक्षण व साहित्य संच, पुस्तिका असे प्रत्येक विद्यार्थ्याला देण्यात आले. या निमित्त शिक्षकांचे गटकार्य, चर्चा आणि शिकवण्याच्या वेगवेगळ्या पद्धती हे विषय हाताळले गेले. याद्वारे ९१२ शिक्षक १,१७,६९८ विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचले.

❋ **विज्ञानदूत प्रशिक्षण –**

विज्ञानदूतांना दरमहा शाळांमध्ये कृतियुक्त विज्ञानाचे तास कसे घ्यायचे याचे प्रशिक्षण वर्षातून दोन वेळा देण्यात आले. या प्रशिक्षणामध्ये संकल्पना अध्ययन, अध्ययन-अध्यापन पद्धती, स्वत: कृती करणे, सत्राची तयारी इ. गोष्टींचा समावेश होता. एकूण ३२ विज्ञान दूतांमार्फत ३४,०६९ विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचलो

❋ **स्वयंसेवक प्रशिक्षण –**

महाविद्यालयीन विद्यार्थी व कंपन्यांतील कर्मचारी स्वयंसेवकांना विज्ञान कृतीआधारित पद्धतीने कसे शिकवावे याचे प्रशिक्षण देण्यात आले. या पुरेशा सरावानंतर स्वयंसेवकांनी शाळांमध्ये जाऊन विद्यार्थ्यांची ही विज्ञानाची सत्रे घेतली. एकूण ४२ प्रशिक्षित स्वयंसेवकांनी २,०६५ विद्यार्थ्यांचे तास घेतले.

➢ **प्रकल्पांतर्गत मुख्य उपक्रम –**

१) ५ वी ते ९ वी च्या गटासाठी मासिक वारंवारितेच्या तासिका, त्याच्या नोंदी आणि वार्षिक अहवाल अशी रचना केली होती. विद्यार्थ्यांविषयी निरीक्षण नोंदवणे हा एक महत्त्वाचा भाग तासानंतर होता. याशिवाय निवडक शाळांमध्ये प्रायोगिक तत्त्वावर ६ वी व ७ वीच्या विद्यार्थ्यांसाठी साप्ताहिक तासिकांची योजना केली. यात कौशल्ये व पुस्तकातील संबंधित घटक जोडण्यात आला.

**२) होमी भाभा बाल वैज्ञानिक स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन ऑनलाईन वर्ग –**

या मार्गदर्शन वर्गाचा मुख्य उद्देश म्हणजे विज्ञान विषय विद्यार्थ्यांना सोप्या भाषेत समजावून सांगणे, तसेच छोट्या प्रयोगांच्या माध्यमातून संकल्पना स्पष्ट करणे व विज्ञानाची स्पर्धात्मक तयारी करणे. या उद्देशाने ऑगस्ट ते नोव्हेंबर २०२४ या कालावधीत, आठवड्यातून दोन वेळा, सेमी-इंग्लिश माध्यमातील चार विद्यार्थिनींना पातळी १ साठी मार्गदर्शन देण्यात आले.

या गटातील कु. मीरा काळे हिला पुढे पातळी ४ साठी प्रकल्प व मुलाखतीचे देखील मार्गदर्शन करण्यात आले. तिने या स्पर्धेत 'रौप्य पदक' मिळवून संस्थेचा गौरव केला.

**३) 'आऊट ऑफ द बॉक्स (विज्ञान कट्टा)'**

या प्रायोगिक उपक्रमात ७ वी ते ९ वीच्या जिज्ञासू १० विद्यार्थ्यांनी सहभागी होऊन प्रत्यक्ष अनुभवाधिष्ठित विज्ञान शिक्षण घेतले. विद्यार्थ्यांनी सुचवल्यानुसार यामध्ये क्षेत्रभेटी, प्रयोगशाळेतील सत्रे व विशिष्ट संकल्पनांवर आधारित विविध कृती राबवण्यात आल्या. शहरी (पुणे) व ग्रामीण अशा दोन्ही भागांमध्ये राबवलेल्या या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक शोधकवृत्ती, आत्मविश्वास व सर्जनशीलता निर्माण झाली.

## ➢ स्पर्धा –

वर्षाच्या शेवटी दोन वेगवेगळ्या गटांतील निवडक विद्यार्थ्यांसाठी स्थानिक ठिकाणी स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. समस्या परिहार ही स्पर्धा ८ वी व ९ वी इयत्तेतील विद्यार्थ्यांसाठी होती. चार तासांची स्पर्धा दोन टप्प्यात घेण्यात आली. यासाठी प्रत्येक इयत्तेमधून चार विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली होती. वैज्ञानिक कौशल्य सादरीकरण स्पर्धा ५ वी ते ७ वी इयत्तेतील विद्यार्थ्यांसाठी होती. ३ तासांच्या या स्पर्धेचेही दोन टप्पे होते.

स्पर्धांना समांतर गटाला घेऊन आलेल्या शिक्षकांसाठी विशेष सत्राचे आयोजन केले होते.

या स्पर्धांसाठी विद्यार्थ्यांची निवड दोन निकषांवर केली गेली. वर्षभर झालेल्या सत्रांतील विद्यार्थ्यांचा कृतिशील सहभाग आणि शिक्षकांनी केलेली शिफारस. यातून आलेल्या विद्यार्थ्यांसाठी त्यानंतर संकल्पना आकलन व उपयोजन कौशल्यावर आधारित चाचणी घेऊन शाळेचे प्रतिनिधी म्हणून ४ विद्यार्थी निवड निश्चित झाली. एक लेखी चाचणी घेण्यात आली, ज्यामध्ये त्यांच्या संकल्पनांची समज आणि उपयोग करण्याच्या कौशल्याची चाचणी घेण्यात आली. या चाचणीच्या निकालाच्या आधारे अंतिम विद्यार्थ्यांच्या गटाची निवड करण्यात आली आणि त्यांनी आपल्या शाळेचे स्पर्धेत प्रतिनिधित्व केले.

**स्पर्धा चित्रफीत**
QR Code


| इयत्ता | प्रकार | दिनांक | विद्यार्थी संख्या | मुख्य आशय |
|---|---|---|---|---|
| ८ वी | समस्या परिहार स्पर्धा विजेते | २६-२९ एप्रिल २०२५ | ७३ | जीवशास्त्र प्रयोग, मॉडेल मेकिंग, गटकार्य, ३डी मॉडेल, सायन्स पार्क क्षेत्रभेट, मेट्रो प्रवास |
| ९ वी | समस्या परिहार स्पर्धा विजेते | २-५ मे २०२५ | ५९ | सायन्स पार्क क्षेत्रभेट, तारांगण, भौतिकशास्त्र, जीवशास्त्र आणि रसायनशास्त्र प्रयोगशाळेत सत्रे, स्वयं अध्ययन कौशल्य, करिअर मार्गदर्शन |
| ७ वी | वैज्ञानिक कौशल्य सादरीकरण स्पर्धा विजेते | २-५ मे २०२५ | ५७ | संग्रहालय व प्रिंटिंग प्रेस : क्षेत्रभेट, मेकॅनो व ३डी मॉडेल, जीवशास्त्र प्रयोग, भारतीय वाद्ये आणि ध्वनी सत्र |


## ➢ पूर्व व उत्तर चाचणी –

वर्षभर राबविण्यात आलेल्या विज्ञान सत्रांवर आधारित इयत्ता ५वी व ८वी तील विद्यार्थ्यांसाठी निवडक शाळांमध्ये पूर्व व उत्तर चाचण्या घेण्यात आल्या.

५वी इयत्तेसाठी वडकी, सोलापूर, कराड, मंगळवेढा, कोल्हापूर, इचलकरंजी आणि अब्दुललाट तर ८वी इयत्तेसाठी वडकी, सोलापूर, रोहा आणि साळुंब्रे या भागामधील प्रत्येकी एका शाळेची निवड करण्यात आली होती.

या चाचण्यांमध्ये विद्यार्थ्यांच्या वैज्ञानिक संकल्पनांची समज, विचारशक्ती व प्रत्यक्ष जीवनातील वापर कौशल्ये तपासण्यासाठी वस्तुनिष्ठ व सविस्तर प्रकारच्या प्रश्नांचा समावेश करण्यात आला होता. ही मूल्यांकन प्रक्रिया प्रकल्पाच्या उद्दिष्टांशी सुसंगत होती. विद्यार्थ्यांमध्ये विश्लेषणात्मक व संकल्पनात्मक अध्ययनाच्या विकासाचा अंदाज घेण्यासाठी उपयुक्त ठरली.




KPIT Technologies या कंपनीच्या CSR योगदानाद्वारे प्रकल्पाचा विस्तार करणे शक्य झाले आणि भारतातील शहरी, ग्रामीण अशा विविध विद्यार्थी गटापर्यंत पोहोचणे आणि कृतियुक्त विज्ञानाच्या माध्यमातून विज्ञानाची गोडी विद्यार्थांना लावणे शक्य झाले.

# मनोगत

## पुस्तकांच्या पलीकडचा विज्ञानाचा तास

शाळा म्हणजे केवळ वर्ग, फळा, पुस्तकं आणि वह्या इतकंच मर्यादित विश्व नव्हे... शाळा म्हणजे विचारांची उकल, अनुभवांची देवाणघेवाण आणि शिकण्याचा अनोखा प्रवास आणि या प्रवासाला अर्थ देणारा एक सुंदर उपक्रम म्हणजे छोटे सायंटिस्टस्.

गेल्या वर्षी मी या उपक्रमात विज्ञानदूत म्हणून सहभागी झालो आणि यंदाही त्या प्रवासाचा मी एक भाग आहे. पण दरवेळेस काही ना काहीतरी नवीन शिकायला मिळतं. हा एक असा प्रयोगशील मंच आहे, जिथे concepts केवळ बोलून समजावल्या जात नाहीत, तर त्या हाताने करायला लावल्या जातात, काना-डोळ्याने पाहायला लावल्या जातात आणि अनुभवून शिकायला लावल्या जातात.

या उपक्रमाचं सर्वात मोठं वैशिष्ट्य म्हणजे, तो विद्यार्थ्यांच्या प्रश्नांना केंद्रस्थानी ठेवतो. प्रश्न विचारणं, निरीक्षण करणं, hypothesis तयार करणं, प्रयोग करणं, आणि नंतर स्वत: निष्कर्षापर्यंत जाणं हे सगळं natural instinct आहे, फक्त ते शाळेत जागं ठेवण्याची गरज आहे. आणि यातूनच तयार होतात छोटे सायंटिस्टस्. Science is not just in the lab, it's in life हे ठामपणे सांगतो.

मी जेव्हा छोटे सायंटिस्टचे सत्र घेण्यासाठी वर्गात पहिल्यांदा गेलो, तेव्हा माझ्या किटमध्ये होत्या फक्त दोन प्लॅस्टिकच्या बाटल्या, काही फुगे, काही कागद, काही मजेशीर क्रिया... पण सगळ्यात मोठं होतं - मुलांचं कुतूहल. त्या क्षणी कुणीही काही विचारलं नाही, पण त्यांच्या डोळ्यांत एकच प्रश्न होता - ''दादा, आज काहीतरी वेगळं होणार, ना?''

''Tell me and I forget. Show me and I remember. Involve me and I understand.'' या ओळी मी अनेकवेळा वाचल्या होत्या, पण त्या दिवशी अनुभवल्या.

शाळेचं वातावरण हे अनेकदा वेळापत्रकात, यादीत आणि पुस्तकात अडकलेलं असतं. पण छोटे सायंटिस्टच्या त्या तासभराच्या वेळेत वर्ग कसा खुलतो, हे शब्दांत सांगता येणार नाही. जसं की एखाद्या मुलाच्या डोक्यात अचानक आलेली कल्पना, ''दादा, जर याचं उलट झालं, तर काय होईल?'' आणि मग त्या कल्पनेवर सगळा वर्ग चर्चेत गुंतलेला असतो...

कधीकाळी जे मुलं सायन्स नाव ऐकताच घाबरायचे, ते आता हातात साध्या गोष्टी घेऊन स्वतःहून प्रयोग करतात. जेवढं त्यांना समजतं, तेवढंच ते दाखवतात, आणि उरलेलं? ते स्वतः शोधायला सुरुवात करतात. हा बदल छोटा दिसतो, पण तो खोलवर जातो. विज्ञान म्हणजे माहिती नव्हे, विज्ञान म्हणजे समज. विज्ञान म्हणजे पाठ नव्हे, विज्ञान म्हणजे अनुभव.

अनेकदा मुलांचे निरीक्षण आणि त्यांचे प्रश्न विचार करायला लावणारे असतात.

या उपक्रमाचं खरं यश हे marks मध्ये नाही, तर त्या एका मुलाच्या चेहऱ्यावर असलेल्या 'अरे हे मी शोधलं!' या भावनेत आहे, असं मला वाटतं.

शेवटी, छोटं सायंटिस्टचं वर्ष संपतं तेव्हा kits पुन्हा आपापल्या ठिकाणी जातात, मुलांच्या, शिक्षकांच्या feedback worksheets fill केल्या जातात... पण जे शिल्लक राहतं, ते म्हणजे - शोधायची वृत्ती. त्यांच्या मनात निर्माण झालेलं कसं? आणि का?

**रोहित बोंदर**
**विज्ञान दूत, छोटे सायंटिस्टस्**

***



# ६. प्रज्ञा विकास



**पुणे शहरातील नागरी वस्ती भागात राहणाऱ्या १२ ते १६ वयोगटातील विशेष गुणवत्ता असलेल्या विद्यार्थ्यांचा शोध घेऊन त्यांच्यामध्ये व्यक्तिमत्व विकास व प्रज्ञा विकास घडवून आणणे.**

प्रज्ञा विकास कार्यक्रम २०१४-१५ पासून भारत फोर्ज लि.च्या अर्थसहाय्याने सुरू झाला. कार्यक्रमाला ११ वर्षे पूर्ण झाली आहेत. प्रारंभी ३ वस्त्यांमध्ये सुरू झालेला हा उपक्रम आता पाच वस्त्यांमध्ये विस्तारला आहे. या कार्यक्रमामुळे वस्तीतील अनेक विद्यार्थ्यांना शैक्षणिक दिशा मिळाली असून शिष्यवृत्ती परीक्षांमध्ये यश मिळाले आहे. विद्यार्थी विज्ञान, वाणिज्य व व्यावसायिक शिक्षणाकडे वळताना दिसतात. वर्गामध्ये नियमित सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये चांगले संस्कार रुजले असून ते अपप्रवृत्तींपासून दूर आहेत. ४ वस्त्यांवरील निवडलेल्या विशेष क्षमताधारक २५ विद्यार्थ्यांसाठी नेतृत्व विकसन कार्यक्रम दर महिन्याला ज्ञान प्रबोधिनीत आयोजित करण्यात आला.

**➢ स्वरूप –**

वर्ग सुरू करण्यासाठी प्रथम वस्तीतील सर्वेक्षण केले जाते. सातवी-आठवीच्या विद्यार्थ्यांची ५० गुणांची चाचणी घेऊन ४० विद्यार्थ्यांची निवड होते. वर्ग दर शनिवारी-रविवारी २-३ तास घेतले जातात. वर्गाची सुरुवात पद्याने होते, अभ्यासानंतर कार्यपत्रक दिले जाते. बैठे व मैदानी खेळ, सूर्यनमस्कार व प्रार्थना घेतली जाते. शिक्षक विद्यार्थ्यांच्या पालकांना घरी जाऊन भेटतात. दर सहा महिन्यांनी पालक सभा घेतली जाते. विद्यार्थ्यांची प्रगती, उपस्थिती व शैक्षणिक प्रगती, मार्गदर्शन यावर चर्चा केली जाते.

**➢ रचना –**

शिक्षक मुलाखतीतून निवडले जातात. पाच शिक्षक, एक प्रकल्प प्रमुख, एक प्रकल्प मार्गदर्शक, कार्यालयीन सहाय्यक व स्वेच्छेने काही महाविद्यालयीन युवक सहभागी होतात.

**➢ घटकांनुसार अभ्यासक्रम – या वर्षातील नवीन घटकांची भर**

| घटक | नव्याने भर | तासिका |
|---|---|---|
| अभ्यास कौशल्य | उपयोजित लेखन - कथा लेखन, जाहिरात लेखन, पत्र लेखन, स्व-मत लेखन, भाषण, लेखन, नकाशा वाचन | ३८ |
| बुद्धिमत्ता संवर्धन | समस्या परिहार स्पर्धा, कालमापन, कल्पनास्फोट तंत्र | १२ |
| व्यक्तिमत्त्व विकसन | पंचकोष विकसन, उपासनेचे महत्त्व, स्वच्छेतेचे महत्त्व, चांगल्या सवयी | १० |
| विज्ञान विकास | विज्ञान संकल्पना - आम्ल आम्लारी, चुंबकत्व, ध्वनि | १२ |
| जीवन कौशल्य व्यवहार | गणपती बनविणे कार्यशाळा, कागदी फुले तयार करणे | १८ |
| विशेष उपक्रम | संविधान दिन, स्वच्छता हीच सेवा उपक्रम, भूगोल दिन, १० वी उत्तीर्ण विद्यार्थी कौतुक समारंभ | २० |
| | **एकूण** | **११०** |

**➢ गृहभेटी –**

सर्व शिक्षकांनी मिळून वस्तीमध्ये महिन्यातून दोनदा जाऊन पालक भेटी घेतल्या. नियमित येणाऱ्या विद्यार्थ्यांच्या पालकांना अभ्यासातील प्रगतीची माहिती दिली. अनियमित विद्यार्थ्यांच्या पालकांच्या अडचणी जाणून घेऊन उपाय सुचवले व विद्यार्थ्यांना नियमितपणे वर्गात पाठवण्याचे आवाहन केले. तसेच केंद्रावर होणाऱ्या सर्व कार्यक्रमांना उपस्थित राहून मुलांच्या प्रगतीत सहभागी व्हावे असेही पालकांना आवाहन करण्यात आले.

➢ **वर्षभरातील अन्य विशेष उपक्रम –**

वर्षभरात जागतिक योग दिन, गुरुपौर्णिमा, स्वातंत्र्य व प्रजासत्ताक दिन, रक्षाबंधन, वाचन प्रेरणा दिन, बाल दिन, संविधान दिन, दिवाळी फराळ, १०वी विद्यार्थी शुभेच्छा समारंभ, तसेच १० वी उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचा गुणगौरव कार्यक्रम, गणपती बनविणे कार्यशाळा, उन्हाळी शिबिर व सहल यांचे आयोजन करण्यात आले.

➢ **शिक्षक प्रशिक्षण –**

प्रत्येक आठवड्यातील शुक्रवारी एक दिवस सर्व केंद्रांतील शिक्षकांची एकत्र बैठक घेतली गेली. यावेळी नियोजित घटकांवर आधारित किमान तीन तासांचे प्रशिक्षण दिले. प्रशिक्षणात विद्यार्थ्यांना लागणाऱ्या साहित्याचे नियोजन व नोंदी कशा ठेवायच्या याचेही मार्गदर्शन केले व प्रत्येक केंद्राच्या शिक्षकांनी मासिक अहवाल सादर केले.

➢ **विद्यार्थी संख्या (वर्ग ७ वी ते १० वी)**

केशवनगर, हडपसर, जनता वसाहत, दत्तवाडी, रामनगर या पाच केंद्रांवरील एकूण ९२ मुले, १०९ मुली अशी एकूण २०१ विद्यार्थ्यांची पटसंख्या नोंदवली गेली. सरासरी १७० विद्यार्थी उपस्थित होते. वर्गाला मुलींची उपस्थिती जास्त होती.

➢ **क्षेत्र भेट – ऐतिहासिक ठिकाण – आगाखान पॅलेस**

दिनांक २२ डिसेंबर रोजी विद्यार्थ्यांसाठी क्षेत्र भेट आगाखान पॅलेस येथे आयोजित करण्यात आली. सर्व केंद्रावरील एकूण ८० विद्यार्थी, ५ शिक्षक व ३ माजी विद्यार्थी यांचा सहभाग होता. संग्रहालयातील एकूण ६ दालनाची सविस्तर माहिती विद्यार्थ्यांनी घेतली. काही विद्यार्थ्यांनी मेट्रोच्या प्रवासाचा आनंद घेतला.

➢ **नवीन कार्यक्रम – नेतृत्व विकसन गटाची सुरुवात**

४ केंद्रातून शिक्षकांच्या व प्रकल्प प्रमुखांच्या निरीक्षणातून नेतृत्व करू शकतील अशा ५ ते ७ विद्यार्थ्यांची निवड झाली. महिन्यातून एक दिवस ४ तास अशा ५ कार्यशाळांची रचना करण्यात आली होती. या सत्रांमध्ये सामाजिक जाणीव, संभाषण कला, विचार कौशल्य, प्रतिभाशाली लेखन, गटचर्चा, प्रतिभा विकसनाची तंत्रे, समस्या ओळख व उपाय, समस्या परिहार स्पर्धा या विषयांवर आधारित कृतीसत्र घेण्यात आली. सरासरी २३ मुले उपस्थित होती.

➢ **नेतृत्व विकसन गट परिणाम –**

प्रथम संस्थेमार्फत जनता वसाहतमध्ये आयोजित उन्हाळी अभ्यास शिबिरामध्ये अक्षरा कुळे या विद्यार्थिनीने लहान मुलांचे खेळ घेणे, अभ्यास घेणे, सूचना देणे, गटकार्य घडवून आणणे अशा विविध कृतींमध्ये सक्रिय सहभाग घेतला.

➢ **प्रज्ञा विकास प्रकल्प परिणाम –**

❊ **गणित विषयात विद्यार्थ्यांची प्रगती वाढली.**

मराठी विषय विद्यार्थ्यांना लिहिताना अवघड वाटतो, त्यांचा भाषिक विकास नीट झालेला नसतो. तसेच अन्य प्रांतातील विद्यार्थी वस्तीत राहतात. घरातील भाषा व शिक्षणाची भाषा वेगळी त्यामुळे लिहिताना अडचण येत आहे.

परंतु गणित हा वस्तीतील मुलांचा दैनंदिन व्यवहाराशी संबंधित विषय आहे, गणितातील एखादी संकल्पना त्यांना समजली की लगेच प्रतिसाद मिळतो. शाळेतील वार्षिक परीक्षेतही गणितात चांगले गुण मिळाले.

❊ **विद्यार्थ्यांमध्ये चांगल्या संस्कारांची रुजवण**

केंद्रावर गेल्यानंतर शिक्षकांना आदराने विद्यार्थी नमस्कार करतात. वस्तीतील इतर मुलांपेक्षा, विद्यार्थ्यांमध्ये स्वच्छता नीटनेटकेपणा व बोलण्यातील नम्रपणा दिसून आला.

❊ **प्रकल्पावर पालकांचा विश्वास**

विद्यार्थ्यांची वर्गातील नियमित उपस्थिती. आयोजित करण्यात आलेले विद्यार्थी शिबिरे, सहलीमध्ये स्वतःहून पालकांनी विद्यार्थ्यांना पाठवले. माता पालकांनी प्रजासत्ताक दिनाच्या व स्वातंत्र्य दिनाच्या कार्यक्रमात मुलांचे कौतुक केले.

❊ **सृजनशीलता विकसित**

जीवन व्यवहार कौशल्य शिकविल्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये सृजनशीलता विकसित झालेली दिसून आली. वैचारिक कौशल्यांचा विकास झाला.

❊ **दहावीचा निकाल शंभर टक्के लागला.**

❊ **जनता वसाहत –** आर्या सापतीसकर – ८४.४०% प्रथम

❊ **रामनगर केंद्र –** श्रावणी सचिन मुळीक – ७७.६०%

❊ **हडपसर केंद्र –** वैभवी पंडित विधाते – ७३.८०%

❊ **दत्तवाडी केंद्र –** श्रवण शैलेश पड्याळ – ५८.८०%

➢ **उन्हाळी शिबिर –**

विद्यार्थ्यांच्या शालेय परीक्षांचे नियोजन जाणून घेऊन शिबिराचे आयोजन २६ ते २९ एप्रिल२०२५ यादरम्यान करण्यात आले. सर्व केंद्रातील ९० विद्यार्थी १० माजी विद्यार्थी असे एकूण १०० विदयार्थी सहभागी होते. सृजनात्मक लेखन, मॉडेल मेकिंग, मैत्री संवाद, अभिव्यक्ती सादरीकरण भूमिका, प्रसार माध्यमांचा वापर, १०वी फ चित्रपट प्रक्षेपण इत्यादी सत्रे झाली.

शिबिरातील विद्यार्थ्यांची ऐतिहासिक सहल पुणे जिल्ह्यातील लोहगड किल्ला पाहण्यासाठी गेली होती. विद्यार्थी, शिक्षक व स्वयंसेवक मिळून १०० जणांचा सहभाग होता.

➢ **उल्लेखनीय यश –**

**१. फिदा शिष्यवृत्ती –** १) **केशवनगर** केंद्रातील **मेघना खांदवे**, २) **हडपसर** केंद्रातील **आयान सय्यद, ३) जनता वसाहत** केंद्रातील **कल्याणी कदम.**

२. **दत्तवाडी** केंद्रातील **श्रावस्ती कांबळे** शिष्यवृत्तीसाठी व **हडपसर** केंद्रातील **स्वप्नील क्षीरसागर** शिष्यवृत्तीसाठी व NMMS साठी पात्र.

**समस्या परिहार स्पर्धा इंस्टाग्राम**

**उन्हाळी शिबिर – इंस्टाग्राम**

# ७. विकासमित्र - रोहा



ग्रामीण भागातील सर्वांगीण विकासाला चालना देणे हा उद्देश डोळ्यासमोर ठेवून शैक्षणिक, सामाजिक, वैज्ञानिक कौशल्य विकासावर भर देत दशकपुर्ती करणारा हा प्रकल्प!

'विकासमित्र – रोहा' प्रकल्प एक्सेल इंडस्ट्रीज लि. रोहा द्वारा श्री स्वामी विवेकानंद रिसर्च अँड ट्रेनिंग इन्स्टिट्यूट, रोहा यांच्या सहकार्याने CSR उपक्रमांतर्गत राबविण्यात आला. ग्रामीण भागातील शैक्षणिक गुणवत्ता सुधारण्याच्या उद्देशाने राबविण्यात आलेल्या या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना फायदा झाल्याचे दिसते. शिक्षण प्रभावी होण्यासाठी मुलभूत कौशल्य विकास घडून यावा यासाठी अभ्यास कौशल्या अंतर्गत वाचन व श्रवण कौशल्य, विज्ञान शिकण्यासाठीची कौशल्य यांचा समावेश करण्यात आला. याशिवाय सृजनशील उपक्रमांच्या माध्यमातून जिज्ञासा, अभिव्यक्ती आणि सामाजिक भान, व्यक्तिमत्व विकास आणि राष्ट्रीय जाणीव निर्माण करण्यासाठी यांचा समावेश केला गेला. शाळांमध्ये प्रशिक्षणप्राप्त विकास दूतांच्या माध्यमातूनही सत्र घेतली जातात. शिकण्याची प्रक्रिया आनंददायी बनवणे व विद्यार्थ्यांचा शिक्षणाकडे सकारात्मक आणि आत्मविश्वासपूर्ण दृष्टीकोन विकसित करणे हा उद्देश सफल होताना दिसतो आहे.

### ➢ रचना आणि स्वरूप

शैक्षणिक वर्ष २०२४–२५मध्ये एकूण ९ शाळांतील ५ वी ते ७ वी च्या विद्यार्थ्यांची ४२७ साप्ताहिक सत्रे घेण्यात आली. ७२० विद्यार्थी यात सहभागी झाले होते.

| कौशल्य क्षेत्र | उपक्रमांचा आढावा आणि निष्कर्ष |
|---|---|
| अभ्यास कौशल्ये | स्वयं–अध्ययन कौशल्य अंतर्गत वाचन, लेखन, श्रवण आणि अभ्यास पायऱ्या यांवर भर देऊन विद्यार्थ्यांच्या अभ्यास सवयी सुधारण्यात आल्या |
| विज्ञान कौशल्य | प्रत्यक्ष अनुभव व प्रयोगाद्वारे निरीक्षण, वर्गीकरण व मोजमाप शिकवून वैज्ञानिक विचारसरणीला चालना दिली. अर्थपूर्ण प्रश्न विचारणे, विचार करणे याची सवय लावण्यात आली. पर्यावरणीय घटक, जैवविविधता, अन्नसाखळी आणि अनुकूलन याचा अभ्यास परिसर अभ्यासातून करण्यात आला. |
| स्व–ओळख व सुरक्षितता | ओळख स्पर्शाची या उपक्रमांद्वारे चांगला स्पर्श–वाईट स्पर्श (Good Touch - Bad Touch) याबाबत माहिती देण्यात आली. |

## मनोगत

विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी ज्ञान प्रबोधिनी पुणे आणि श्री. विवेकानंद रिसर्च ॲण्ड ट्रेनिंग इन्स्टिट्यूट रोहा यांच्या माध्यमातून मागील वर्षापासून आमच्या विद्यालयात गणित, भाषा व इंग्रजी या विषयांबाबत विशेष उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमातंर्गत दर महिन्याला आठवड्यातून एक दिवस अध्ययन–अध्यापनाचे कार्य करण्यात आले. इ.५ वी ते इ. ७ वीचे विद्यार्थी या उपक्रमात सहभागी करण्यात आले. या विशेष तासिकांसाठी संस्थेकडून नियुक्ती करण्यात आलेल्या सौ. संपदा शिर्के मॅडम यांनी आपल्यावर सोपविलेली जबाबदारी व्यवस्थितरित्या पार पाडली. त्यांनी आपणहून जबाबदारीपेक्षा विदयार्थ्यांना अधिकाधिक शैक्षणिक अनुभव व विविध कौशल्ये मनापासून शिकविली, त्यांनी शिकविलेले विद्यार्थ्यांनी मनापासून ग्रहण केले. त्याचा सुयोग्य परिणाम देखील आम्हाला जाणवू लागला. विद्यार्थी हे भावी भारताचे भविष्य आहेत. त्यांना अधिक सक्षम व समर्थ बनविण्यासाठी एक्सेल कंपनीकडून राबविण्यात येत असलेल्या या स्तुत्य उपक्रमाचे कौतुक करावे, तेवढे थोडेच आहेत.

**– श्री. दिपक कुंडलिक जगताप,**
मुख्याध्यापक, श्रमिक विद्यालय चिल्हे, ता. रोहा

# ८. विकासमित्र - पडसरे




**आदिवासी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक व व्यक्तिमत्व विकासाला चालना देणे या उद्देशाने हा प्रकल्प रायगड जिल्ह्यातील पडसरे गावातील आश्रमशाळेत इयत्ता ५वी ते १०वी तील विद्यार्थ्यांसाठी राबवला जात आहे.**

सलग दुसऱ्या वर्षी या प्रकल्पांतर्गत नियोजनबद्ध अशा मासिक तीन दिवसीय निवासी शिबिरांच्या माध्यमातून अभ्यासकौशल्ये, विज्ञान शिक्षण, व्यक्तिमत्त्व विकास आणि राष्ट्रीय जाणीव या विषयांवर आधारित सत्रे विद्यार्थ्यांसाठी घेण्यात आली. एकूण ८ शिबिरांमधून २९८ विद्यार्थ्यांसाठी २११ सत्रे घेतली. या प्रकल्पाचे सुसूत्र नियोजन व सातत्यपूर्ण अंमलबजावणी AFCONS Ltd. मुंबई (शापूरजी पालनजी ग्रुप,मुंबई अंतर्गत) यांच्या CSR सहकार्यामुळे शक्य झाले आहे.

या वर्षात विविध उपक्रमांद्वारे इयत्ता ५ वी ते १० वीच्या विद्यार्थ्यांचा शैक्षणिक आणि व्यक्तिमत्त्व विकास साधला गेला. विज्ञान शिक्षणासाठी अनुभवाधारित पद्धती वापरण्यात आली. इयत्ता ५ वी ते ७ वीमधील विद्यार्थ्यांनी निरीक्षण, वर्गीकरण, प्रश्न विचारुन आणि साधे प्रयोग करत वैज्ञानिक प्रक्रियेचा सराव केला. इयत्ता ८ वी आणि ९ वीच्या विद्यार्थ्यांनी बल, चुंबकत्व, विद्युतप्रवाह, रसायनशास्त्र आणि यांत्रिकी प्रणाली यांवर आधारित प्रात्यक्षिके व प्रकल्प तयार केले, ज्यात ऑटोमेटा मॉडेल्स यांचा समावेश होता. यामुळे वैज्ञानिक विचारसरणी आणि आत्मविश्वास वाढीस लागला.

व्यक्तिमत्त्व विकास सत्रांमध्ये विद्यार्थ्यांच्या आत्मविश्वास, सर्जनशीलता आणि संवाद कौशल्यांवर भर देण्यात आला. लहान गटासाठी राखी बनवणे, पेपर रोबोट, नाटुकले, भावनिक विकासाचे उपक्रम राबवले गेले. मोठ्या गटासाठी वक्तृत्व, संवाद, त्रिमितीय प्रतिकृती, शारीरिक-मानसिक विकास व SWOT विश्लेषण अशा कार्यशाळा घेतल्या. राष्ट्रीय जाणीव वाढवण्यासाठी ५ वी ते ७ वीच्या विद्यार्थ्यांना जलसंवर्धन आणि भारताची सांस्कृतिक विविधता याची ओळख करून दिली. मोठ्या गटासाठी नागरिकांचे कर्तव्य, निवडणूक प्रक्रिया व वारसा संवर्धनावर चर्चा व सादरीकरणे घेतली गेली.

गणित विषयाच्या पूर्वचाचणीतून विद्यार्थ्यांची मूलभूत गणिती समज कमी असल्याचे लक्षात आले. यावर उपाय म्हणून गणित साहित्य संच वापरून विद्यार्थ्यांचे प्रशिक्षण/तास घेण्यात आले. कृतियुक्त खेळांनी गणिती संकल्पना समजायला मदत झाली. वर्षाखेरीस उत्तर चाचणीत सकारात्मक सुधारणा दिसून आली.

दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी स्वयंअध्ययन कौशल्यांचे प्रशिक्षण घेण्यात आले. यात उद्दिष्ट निश्चिती,अभ्यास पायऱ्या, वेळेचे नियोजन, तक्ते व माइंड मॅप तयार करणे, परीक्षा पूर्व तयारी अशा गोष्टींचा समावेश होता. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांनी ७०% गुण मिळवून चांगली कामगिरी केली. या शिकवणी शिवाय मिळालेल्या यशाने स्वयंअध्ययन कौशल्याचे महत्त्व अधोरेखित झाले.

कंपनी कर्मचारी सहभागउपक्रम-विद्यार्थ्यांच्या अभ्यासक्रमाशी संबंधित मॉडेल करण्याचे कर्मचाऱ्यांचे १ दिवसीय प्रशिक्षण घेऊन त्यांनी विद्यार्थ्यांची प्रत्यक्ष तयारी करून घेतली. यानंतर विज्ञान व भूगोल यातील संकल्पनांवर आधारित प्रकल्प व मॉडेलचे सादरीकरण त्यांनी विज्ञान दिनानिमित्त शाळेत केले.

पडसरे शिबिरातील चित्रफीत

### मुख्याध्यापकांचे मनोगत

ज्ञान प्रबोधिनी आणि S.P. फाउंडेशन, AFCONS कंपनी यांना धन्यवाद देऊ इच्छितो की, शाळेतील आदिवासी गरजू आणि घरची कोणतीही शैक्षणिक पार्श्वभूमी नसलेल्या विद्यार्थ्यांची बौद्धिक, शारीरिक, मानसिक वृद्धी होण्यासाठी हा प्रकल्प अतिशय उपयुक्त आहे.

विद्यार्थ्यांमध्ये भारतीय संस्कृतीमूल्ये जोपासणे, विज्ञानाची आवड निर्माण करणे, विद्यार्थ्यांचे हस्ताक्षर सुधारणे, वाचनाची आवड निर्माण करणे. तसेच ३डी मॉडेल, नकाशा वाचन, अभ्यासतंत्र याचे मार्गदर्शन केले. माझा सर्वात आवडता उपक्रम म्हणजे दि. १ फेब्रुवारी २०२५ चे शाळेतील विज्ञान प्रदर्शन! विद्यार्थ्यांनी केलेल्या गटशः सादरीकरणातून शाळेचे वातावरण विज्ञानमय होण्यास मदत झाली. शिबिरात योग व व्यायामाचे महत्त्व सांगितले. यातून विद्यार्थ्यांमध्ये सकारात्मक बदल दिसून आला. पुढील वर्षीसुद्धा विकासमित्र प्रकल्पाचे आयोजन व्हावे ही नम्र विनंती.

**- श्री. शिंदे संदिप यशवंत**
माध्यमिक आश्रमशाळा, पडसरे

# ९. स्वयंअध्ययन कौशल्य कार्यक्रम (इयत्ता १० वी)




ग्रामीण विद्यार्थ्यांमध्ये स्व-अभ्यास कौशल्ये व स्व-शिक्षणाची सवय निर्माण व्हावी हा हेतू. विद्यार्थ्यांना त्यांच्या शैक्षणिक प्रवासात अधिक आत्मविश्वास आणि शिस्तीने अभ्यास करता यावा हे उद्दिष्ट! माध्यमिक शाळा प्रमाणपत्र (SSC) परीक्षेमध्ये यश मिळवण्यासाठी स्व-अभ्यास, तयारी आणि सतत पाठपुरावा ह्या पद्धतीने राबवलेला हा कार्यक्रम / उपक्रम.

### ➢ विद्यार्थ्यांसाठी स्व–अभ्यास कौशल्य –

विद्यार्थ्यांना स्वतंत्रपणे अभ्यास करण्यासाठी आवश्यक असलेली शिस्त आणि सवयी विकसित करण्यासाठी मार्गदर्शन करण्यात आले. हे मार्गदर्शन पुढील बाबींवर केंद्रित होते-उद्दिष्ट निश्चिती, वेळेचे नियोजन, स्मरण कौशल्य तंत्र, विषयनिहाय संकल्पना समजून घेणे. अभ्यासातील अडथळ्यांवर मात कशी करायची, पेपर लेखन कसे करायचे, प्रश्नपत्रिका विश्लेषण, तसेच परीक्षेपूर्वीची शेवटच्या टप्प्यातील तयारी-ताण व्यवस्थापन आणि आरोग्य जागरूकता यावरही भर देण्यात आला. छापील कार्यपत्रके, सराव परीक्षा याद्वारा शैक्षणिक उद्दिष्टांच्या दिशेने विद्यार्थी स्वतःचा अभ्यास प्रवास नियोजित करू शकले. या प्रक्रियेत शिक्षकांनी सक्रिय सहभाग घेतल्यामुळे शाळा पातळीवरही पाठबळ कायम राहिले.

स्वयंअध्ययन मार्गदर्शन कार्यक्रम, Excel Industries Group, Roha, AFCONS Ltd Mumbai, आणि श्री. विवेकानंद रिसर्च अँड ट्रेनिंग इन्स्टिट्यूट, रोहा यांच्या महत्त्वपूर्ण CSR पाठबळामुळे यशस्वीरित्या राबविला.

### ➢ उपक्रमातील सहभागाचा आढावा –

| अ.क्र. | संस्था / परिसर | शाळा | विद्यार्थी |
|---|---|---|---|
| १. | रोहा तालुका शाळा, रोहा | १८ | ४२५ |
| २. | कास्प पुणे (शहर आणि हडपसर) पुणे | २ | ८० |
| ३. | समता विद्यालय, हडपसर, पुणे | १ | १२० |
| ४. | हिरकणी विद्यालय, गावडेवाडी, मंचर, पुणे | १ | ५० |
| ५. | अनुदानित आश्रमशाळा, पडसरे, रायगड | १ | ४० |
| ६. | पुणे शहर - मे-जून २०२४ कार्यशाळा | १ | ५० |
| ७. | आदर्श शाळा व कनिष्ठ महाविद्यालय, वाकरे, कोल्हापूर | १ | ६० |
| ८. | ज्ञान प्रबोधिनी विद्यालय, हराळी, धाराशिव | १ | १०० |
| ९. | स्वरुपवर्धिनी, पुणे | १ | ४० |
| एकूण | | २७ | ९६५ |

### ➢ परिणाम –

या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये स्वयंशिस्त, आत्मविश्वास आणि अभ्यासातील स्पष्टता वाढली. नियोजित अभ्यासामुळे आणि शिस्तबद्ध पद्धतीमुळे त्यांना परीक्षेची तयारी करताना कमी ताण जाणवला. छापील अभ्यास साहित्य, उद्दिष्ट-निश्चिती, नियोजन, तक्ते आणि सराव प्रश्नपत्रिका यामुळे विद्यार्थ्यांचा अभ्यास अधिक केंद्रित झाला. विद्यार्थ्यांमध्ये परीक्षेच्या वेळेचे व्यवस्थापन आणि तयारी यामध्ये शिक्षकांनी सुधारणा झाल्याचे नमूद केले.

### ➢ विद्यार्थ्यांचे व शाळांचे अभिप्राय –

विद्यार्थ्यांनी उपक्रमाबाबत अतिशय सकारात्मक अभिप्राय दिला. त्यांना ही सत्रे उपयुक्त आणि कार्यपत्रके मदत करणारी वाटली. अशा शिस्तबद्ध पद्धतीने अभ्यासाचे पहिल्यांदाच नियोजन करणारे अनेक विद्यार्थी होते.

या उपक्रमाच्या सर्व विद्यार्थी गटापर्यंत पोहचण्याचे समाधान शिक्षकांनी व्यक्त केले. पुढील विस्तारासाठी आग्रह केला.

मुख्याध्यापकांनीही या उपक्रमाचे स्वागत केले व हे तंत्र नियमित शाळा अध्यापन प्रक्रियेत समाविष्ट करण्याचे ठरवले.

छापील करिअर चार्टस् विद्यार्थ्यांसह पालकांनाही अतिशय उपयुक्त वाटले - यामुळे इयत्ता १०वी नंतरच्या शैक्षणिक व व्यावसायिक संधींची कल्पना मिळाली.

### ➢ प्रतिसाद –

ग्रामीण विद्यार्थ्यांसाठी स्वयंअध्ययन सत्रांद्वारे उद्दिष्ट ठरवणे, नियोजन, टिपणे काढणे व परीक्षेची तयारी यासारखी मूलभूत शैक्षणिक कौशल्ये विकसित करण्यात आली. ही त्यांच्या पुढील शिक्षणासाठीही उपयुक्त ठरतील. विद्यार्थ्यांमध्ये नवनवीन शिकण्याच्या पद्धती स्वीकारण्याची जिज्ञासा दिसून आली. शाळांमध्ये शिक्षक जर ही तंत्रे नियमित वापरू लागले, तर याचा प्रभाव अधिक व्यापक आणि दीर्घकालीन असेल. यासाठी ज्ञान प्रबोधिनीमार्फत शिक्षक प्रशिक्षण सत्रांचे आयोजनही करण्यात आले.

***

# १०. प्रेरणा सेतू




पारंपरिक करिअर मार्गांव्यतिरिक्त वेगळ्या नवीन करिअर क्षेत्रांची माहिती विद्यार्थ्यांना करून देणे व त्या क्षेत्रातील यशस्वी व्यक्तींच्या मार्गदर्शनाने विद्यार्थ्यांमध्ये प्रेरणा जागृत करणे ही प्रेरणा सेतूची वैशिष्ट्ये!

ज्ञान प्रबोधिनी, शैक्षणिक उपक्रम संशोधिका आणि ज्ञान प्रबोधिनी फाऊंडेशन (अमेरिका) यांच्या संयुक्त विद्यमाने प्रेरणा सेतू हा कार्यक्रम राबविला जातो. यामध्ये विविध क्षेत्रातील तज्ज्ञ दूरस्थ पद्धतीने निवडक शाळेतील विद्यार्थ्यांशी संवाद साधतात. त्यांच्या जीवनाच्या प्रेरणादायी प्रवासातून शालेय विद्यार्थ्यांना विविध कार्यक्षेत्रांचे दर्शन घडविणे, त्यातील आव्हाने व त्यावर मात करत मिळवलेले यश, त्यांचे आदर्श आणि प्रेरणास्थाने मुलांना सांगणे हे या सत्रातून साधले जाते. विविध क्षेत्रांतील तज्ज्ञ आपला प्रेरक प्रवास विद्यार्थ्यांसमोर मांडतात आणि लहानपणापासून त्यांना विकसित करण्यासाठी आवश्यक असलेली कौशल्ये कशी आत्मसात करायची हे विद्यार्थ्यांना सांगतात.

२०२४-२५ या शैक्षणिक वर्षात भारतातील आसाम, अरुणाचल प्रदेश, मध्यप्रदेश, महाराष्ट्र, कर्नाटक, तमिळनाडू आणि गोवा या ७ राज्यातील शाळांनी या कार्यक्रमात सहभाग नोंदविला.

| विषय | सत्रांचे शीर्षक | |
|---|---|---|
| Entreprenuership | 1) Software Consultant<br>2) Innovation and Entrepreneurship | 3) Cultivating a Business Mindset<br>4) Innovation or invention? |
| AI and Software Engineering | 1) Engineer to Entrepreneur<br>2) AI in everyday life | 3) Sharpening the skills<br>4) AI in the field of medicine |
| Designing | 1) Product designing<br>2) A journey with knowing yourself | 3) Skills in designing |
| Civil Services | 1) My journey... Not yours! Know yourself<br>2) Chasing a dream | 3) Opting civil services as career<br>4) A journey of motivation! |
| Social Work | 1) Social work : A need and an experience | 3) Social work : An opportunity to transform |
| | 2) Sustainability : Contributing to the future | 4) Social work : A spectrum to work |
| Armed Forces | 1) Career in Armed Forces | 2) A motivating journey of young officer |
| प्रत्येक विषय पूर्ण झाल्यानंतर विद्यार्थ्यांची सादरीकरणे! | | |
| **६ विषय! २१ प्रेरणादायी गोष्टी! ११५ विद्यार्थी! ७ राज्ये!** | | |



# ११. ज्ञान सेतू



**ज्ञान सेतू प्रकल्पाच्या माध्यमातून भारतातील सीमावर्ती व आव्हानात्मक राज्यातील दुर्गम भागात विज्ञान आणि गणित हे साधन वापरून महाविद्यालयीन गटाला अन्य राज्यात जाऊन राष्ट्रीय एकात्मतेचे दर्शन घडावे ; हा या प्रकल्पाचा मुख्य उद्देश !**

ज्ञान सेतू प्रकल्पाचा मुख्य उद्देश म्हणजे स्वयंसेवकांना विज्ञान व गणित कार्यशाळा हे एक साधन म्हणून वापरून राष्ट्रीय एकात्मतेचे दर्शन घडावे हा आहे. कृतियुक्त शिक्षणाचा अनुभव देण्याच्या हेतूने विज्ञान कार्यशाळा, गणित कार्यशाळा या बरोबरच इतर विषयांच्या कार्यशाळेचा समावेश केला आहे.

'Know our Country' या प्रदर्शनातून भारतातील विविधतेतील एकता ही संकल्पना मांडली जाते. भाषाशैली, खाद्यसंस्कृती, सण, पर्यटनस्थळे इत्यादी विषयांद्वारे प्रभावीपणे प्रदर्शनाची मांडणी केली जाते, ज्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये कुतूहल आणि जिज्ञासा निर्माण होते असे लक्षात आले. सांस्कृतिक कार्यक्रमांद्वारे विविध राज्यातील पोशाख, नृत्य, खाद्यपदार्थ यांचे दर्शन होते. समाज दर्शन घडावे या हेतूने स्वयंसेवकांसाठी स्थानिक भागात सर्वेक्षण, व्यक्तींच्या मुलाखती घेणे असे नियोजन केले जाते.

स्वयंसेवकांची नोंदणी ते गटाने प्रत्यक्ष दौऱ्याला जाणे या प्रक्रियेचे अनेक टप्पे केले. यात प्रशिक्षण, पूर्वतयारी म्हणून डेमो, प्रवासातील खेळ आणि परत आल्यानंतर अभिप्राय, दस्तावेजीकरण ते अनुभव कथनासाठीचा कार्यक्रम असा प्रवास पुढील टप्प्यांमध्ये केला जातो.

| | |
|---|---|
| १. नोंदणी | ८. साहित्य पेटी रचना |
| २. प्रशिक्षण | ९. सराव सत्र |
| ३. गट तयार करणे | १०. प्रत्यक्ष दौरा |
| ४. राज्यांनुसार गट विभागणी | ११. अहवाल |
| ५. प्रवासाचे नियोजन | १२. उत्तर चाचणी |
| ६. परिचय सत्र | १३. बैठक-प्रतिसाद, अभिप्राय |
| ७. पूर्व चाचणी | १४. मेळावा |

➢ **विस्तार –**

विविध महाविद्यालयातील स्वयंसेवकांमार्फत अनेक राज्ये व केंद्रशासित प्रदेशांमध्ये एप्रिल २०२४ ते मार्च २०२५ या कालावधीत ज्ञान सेतूचे दौरे झाले. या स्वयंसेवकांनी दुर्गम भागांमध्ये विविध कार्यशाळा घेतल्या आणि स्थानिक समाज समजून घेण्यासाठी अनेक उपक्रम केले, त्याचा एकूण आढावा खालील तक्त्यात नोंदवला आहे.

| राज्य/केंद्रशासित प्रदेश | ठिकाण | विद्यार्थी संख्या |
|---|---|---|
| आसाम | तेजपूर | ५९३ |
| आसाम | पार्वतीपूर | ४३० |
| आसाम | तिनसुखिया | ५९४ |
| झारखंड | टाटानगर | ६७४ |
| मध्यप्रदेश | नर्मदालया | १०० |
| अरुणाचल प्रदेश | रोईंग | ४० |
| आसाम | मोंगोलडोई | ७५० |
| आसाम | नलबारी | ६३५ |
| आसाम | काजलगाव | ५८४ |
| आसाम | सुकलाई | ७१७ |
| मेघालय | खासी आणि जयंतिया हिल्स | ६६७ |
| नागालँड | दीमापूर | ५५० |
| ओडिशा | बालासोर | २६४२ |
| अरुणाचल प्रदेश | तेजू | ९५० |
| जम्मू आणि काश्मीर | पूंछ | ९६० |
| बिहार | गया | ६९० |
| आसाम | पार्वतीपूर | ६०० |
| **एकूण विद्यार्थी संख्या : १२,१७६** | | |


या वर्षभरात एकूण १२७ महाविद्यालयातील स्वयंसेवकांच्या माध्यमातून ९ राज्यांतील ११४ शाळा व १२१७६ विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचले.

### ➢ प्रभाव –

दौऱ्याला जाण्यापूर्वी ज्ञान सेतू स्वयंसेवकांची पूर्वचाचणी घेण्यात आली. दुर्गम व सामाजिकदृष्ट्या मागास भागांमधील विविध समाज गटांशी संवाद साधण्याबाबत असलेला त्यांचा दृष्टिकोन, विविध व्यक्ति विकासाची कौशल्ये, राष्ट्रीय एकात्मतेवर त्यांचे मत याची माहिती समजून घेता आली.

यानंतर जून व जुलै महिन्यांत प्रत्यक्ष दौऱ्यावरून आल्यावर या बाबतीत झालेले वैचारिक बदल समजून घेण्यात आले ज्याच्यावर त्यांनी दौऱ्यांमध्ये घेतलेल्या अनुभवांचा प्रत्यक्ष प्रभाव कसा होतो हे समजले.

याशिवाय अभ्यासाचा भाग म्हणून स्वयंसेवकांनी विज्ञान, गणित व प्रदर्शन विषयक समज तपासण्यासाठी म्हणजेच प्रशिक्षणादरम्यान शिकवलेल्या संकल्पनांचे आकलन आणि शिकवण्याच्या दृष्टीने तयारी समजून घेण्यासाठी बहुपर्यायी प्रश्नांचा समावेश असलेली एक चाचणी घेण्यात आली. यावरून किती तयारी करायची गरज आहे असे लक्षात आले.




| क्र. | घटक | दर्शक |
|---|---|---|
| अ | राष्ट्रीय एकात्मतेची समज | स्वयंसेवक भारताच्या विविध प्रांतातील, संस्कृतीतील आणि लोकांमधील एकतेची कशी जाणीव ठेवतात हे दर्शवते. |
| ब | अपेक्षा व वास्तव | नवीन सामाजिक व शैक्षणिक परिस्थितीचा अनुभव घेतल्यानंतर स्वयंसेवकांच्या दृष्टिकोनात झालेला बदल दर्शवतो. |
| क | वैयक्तिक विकास व कौशल्य वृद्धी | स्वयंसेवकांच्या आत्मविश्वास, संवाद कौशल्ये व प्रत्यक्ष शिक्षण देण्याच्या कौशल्यांमध्ये झालेली प्रगती दाखवतो. |
| ड | ज्ञान सेतूचा प्रभाव व धारणा | स्वयंसेवकांना या प्रकल्पाची उपयोगिता कशी वाटली हे अधोरेखित करतो. |
| इ | स्थानिकांशी संवाद व सांस्कृतिक आदानप्रदान | स्वयंसेवकांनी समुदायांशी केलेली मैत्रीपूर्ण व सांस्कृतिक आदानप्रदान कशी झाली, हे स्पष्ट करतो. |
| फ | मार्गदर्शन व संघभावनेची भूमिका | सहकारी शिक्षण व मार्गदर्शकांच्या पाठिंब्यामुळे स्वयंसेवकांचे सहकार्य व व्यक्तिमत्त्व विकास कसा घडला, हे दर्शवतो. |

### ➢ १५ ऑगस्ट मेळावा –

१५ ऑगस्ट २०२४ रोजीचा मेळावा हा एक संस्मरणीय कार्यक्रम ठरला, ज्यात २४० हून अधिक सदस्य उपस्थित होते. कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्यांमध्ये लेफ्टनंट जनरल श्री. एस. एस. हसबनीस (पीव्हीएसएम, व्हीएसएम, एडीसी (निवृत्त), डेप्युटी चीफ ऑफ आर्मी स्टाफ) आणि श्री. आशिष श्रीवास्तव (शिक्षार्थ, NGO, छत्तीसगड) यांचा समावेश होता.

कार्यक्रमात टीम सोप्रानो यांनी देशभक्तीपर गीतांचे सुंदर सादरीकरण केले. स्वयंसेवकांनी ज्ञान सेतू 'दौऱ्यातील एक दिवस' याचे नाट्य सादरीकरण करून उपस्थितांना त्यांच्या अनुभवाची झलक दिली.

सर्व सहभागी गटांना प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले, तसेच काही गट व स्वयंसेवकांना त्यांच्या उत्कृष्ट योगदानाबद्दल विशेष पारितोषिके देण्यात आली. विविध राज्यांतील संस्कृती दर्शवणारे प्रदर्शनही यावेळी मांडण्यात आले होते, ज्यातून भारताच्या विविधतेतील एकतेचे दर्शन घडले.

ब्लूम कम्बशन इंडिया प्रा. लि. या कंपनीच्या CSR योगदानाद्वारे विविध राज्यांमध्ये प्रत्यक्ष जाऊन आणि स्थानिक संस्थांनी विविध स्तरांवर साहाय्य आणि मार्गदर्शन केल्यामुळे या प्रकल्पाचा अधिक विस्तार करता आला.



ज्ञान सेतूचे स्वरूप

इंस्टाग्राम वेबसाईट

## मनोगत

मी डिसेंबर महिन्यापासून प्रबोधिनीमध्ये शिक्षणदूत म्हणून काम करण्यास सुरुवात केली आहे. प्रबोधिनीची ओळख मला माझ्या बहिणी मुळे झाली ती विकासमित्र प्रकल्पात शिक्षणदूत म्हणून काम करत आहे. तिने ह्या प्रकल्पाबद्दल मला सांगितले. प्रबोधिनीमध्ये काम करत असताना मला खूप नवीन गोष्टी शिकायला मिळाल्या. एखाद्या व्यक्तीसोबत बोलणे, मुलांना नवीन गोष्टी शिकवणे, गटात काम करणे, नवीन गोष्टी शिकणे, पुस्तके वाचन अशा अनेक गोष्टी मी आजही नव्याने शिकत आहे. ह्या प्रकल्पात जे शिक्षणदूत म्हणून प्रत्येक गावातील महिलांना निवडतात ही गोष्ट मला विशेष वाटते. कारण घरातील कामामधून महिलांना स्वतःचा विचार करण्यासाठी वेळ मिळत नाही. प्रत्येक गावात त्याच गावातील महिला तिथल्या शाळेतील मुलांना शिकवते, त्यामुळे तिला तिच्या स्वतःच्या पायावर उभे राहता येत आहे.ह्या प्रकल्पाचा विद्यार्थ्यांना खूप उपयोग होत आहे कारण फक्त पुस्तकी ज्ञान न घेता समाजातील इतर गोष्टींची जाणीव होणे, त्यांचे व्यक्ती म्हणून विकसन होणे, काहीतरी करून दाखवण्याची जिद्द विद्यार्थ्यांमध्ये निर्माण होत आहे. गावपातळीवर विद्यार्थ्यांना त्यांचे हक्काचे असे प्रबोधिनीमधील बरेच व्यक्ती मिळाले आहेत की त्यांच्या करिअरबद्दल, त्यांच्या आयुष्यातील अनेक प्रश्न ते त्या व्यक्तीसोबत बोलू शकतात. मी शिक्षणदूत म्हणून काम सुरू केले तेव्हा मी पहिला तास हा लोकशाही व देशप्रश्न ह्या विषयावर 'वीर बाजी पासलकर, पानशेत' ह्या शाळेत घेतला. ह्या तासामुळे मला खूप नवीन गोष्टींचा अभ्यास करता आला. मुलांना काय शिकवायचे ह्याची आधी तयारी केली होती आणि त्या तयारी चा कुठेतरी मुलांना खूप फायदा झाला असे वाटले कारण मुलांसोबत बोलताना त्यांनी त्यांच्या गावातील, घरातील अडचणी मला सांगितल्या. आजही त्या शाळेत गेल्यावर ती मुले मला सांगतात, ''ताई तुझा तो तास खूप छान झाला होता.'' त्यामुळे खूप छान वाटते व अजून नवीन गोष्टीची माहिती करून घेऊन त्यांना सांगावी वाटते.ह्या प्रकल्पामुळे मला माझ्यातील चांगल्या वाईट बाबी समजत आहेत व त्याच्यावर मी कसे काम करू शकते हे देखील मी शिकत आहे. प्रकल्पातील सर्व व्यक्ती खूप छान समजून घेतात आणि एखादी गोष्ट नाही समजली तर समजून देखील सांगतात. मी ह्या प्रकल्पात अजून जेवढे काम करता येईल तेवढे करण्याचे प्रयत्न करेन.

**– पल्लवी तळेकर**
विकासमित्र, शिक्षण दूत

## अनुभव – अपेक्षेपलीकडचे बिहार

नोव्हेंबर २०२४ मध्ये ज्ञान सेतू या प्रकल्पाच्या माध्यमातून मला बिहार (गया जी) येथील विविध शाळेत विज्ञान व गणित कार्यशाळा घ्यायची संधी मिळाली, त्यादरम्यान विविध लोकांशी झालेल्या प्रत्येक भेटीत प्रचंड प्रेम मिळाले. चौथ्या दिवशी दुपारच्या जेवणानंतर सर म्हणाले, ''चलो बाजार घुमके आते ।'' आम्ही खुश! बाजारात सरांनी आम्हाला एका कपड्यांच्या दुकानासमोर थांबवले. सर आतमध्ये जाऊन त्या दुकानातील व्यक्तीशी काहीतरी बोलले. ती व्यक्ती आमच्याकडे आतमधून वरपासून खालपर्यंत पाहू लागली. आम्ही जरा घाबरलो. नंतर त्यांनी आम्हाला आवाज दिला, ''बच्चो अंदर आओ ।'' आत जाताक्षणी त्यांनी आम्हाला विचारले, ''बताओ शर्ट कि साईज क्या चाहिए?'' मग आम्हाला पटकन समजलं की सर आम्हाला कपडे घेत आहेत. आम्ही खूप वेळ नाही म्हणालो. शर्ट घेऊनच दिला. पॅन्टचा आग्रह मात्र मोडून काढला. दुकानातून बाहेर पडल्यावर सरांनी गया जी प्रसिद्ध तिलकूट प्रत्येकाला दिले. हे सगळं बघून कुठेतरी मन भरून आलं, डोळे पाणावले.

बिहारमधून निघताना कपडे, तिलकूट, असंख्य लोकांचे प्रचंड प्रेम हे आमच्यासोबत होतं. हे सगळं बघून बिहारमधून निघू वाटत नव्हतं. आजपर्यंत बिहार पाहिलं होतं ते रेल्वेतूनच. अस्वच्छ, बेशिस्त, अरेरावी करणारे लोक. पण या दौऱ्यात बिहारची माणसं खऱ्या अर्थाने अनुभवली.

**– आविष्कार भिंताडे**
ज्ञान सेतू, प्रकल्प समन्वयक

***

## अनुभव शाळा ते प्रज्ञा विकास – एका विद्यार्थिनीचा प्रवास –

वैभवी विधाते, मूळची धाराशिव जिल्ह्यातील, अत्यंत हलाखीच्या परिस्थितीतही शिकण्याची जिद्द असणारी मुलगी. वडील वॉटरप्रूफिंगचे काम करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करतात. वैभवीने जुनी पुस्तके वापरून, कोणताही क्लास न लावता १०वीत ७३.८०% गुण मिळवले. ती प्रज्ञा विकास वर्गाची नियमित विद्यार्थीनी असून तिने अभ्यासातील अडचणी शिक्षकांशी संवाद साधून दूर केल्या. आईच्या अनुपस्थितीत तिने लहान भावंडांची जबाबदारीही समर्थपणे पार पाडली. डॉक्टर होण्याचे स्वप्न उराशी बाळगणाऱ्या या जिद्दी विद्यार्थिनीच्या यशामागे तिची मेहनत, चिकाटी व आत्मविश्वास आहे. प्रज्ञा विकास वर्गाकडून तिच्या पुढील वाटचालीस खूप खूप शुभेच्छा!

***

# १२. उन्हाळी शिबिरे एप्रिल-मे २०२५

| प्रकल्प | कालावधी | आशय | विद्यार्थी वयोगट | सहभागी विद्यार्थी |
|---|---|---|---|---|
| अनुभव शाळा | २३ ते २७ एप्रिल | १) अनुभवाधारित शिक्षण<br>२) कौशल्य विकास आणि सृजनशीलता यावर भर<br>३) संस्कार व मूल्यांचा विकास | ६ ते ११ वर्षे | १७१ |
| छोटे सायंटिस्ट्स् | २६ ते २९ एप्रिल ८वी | १) अनुभव शिक्षण | ८ वी | ७३ |
| | २ मे ते ५ मे ९ वी | २) कृतीयुक्त अध्ययन | ९ वी | ५९ |
| | २ मे ते ५ मे ७ वी | ३) क्षेत्रभेट | ७ वी | ५७ |
| प्रज्ञा विकास | २६ ते २८ एप्रिल | १) व्यक्तिमत्त्व विकासासाठी सृजनशीलता आणि अभिव्यक्ती यावर भर<br>२) संस्कार व मूल्यांचा विकास | ११ ते १६ वर्षे | १०० |
| स्वयंअध्ययन कार्यशाळा | २८ ते ३ एप्रिल साळुंब्रे | १) उद्दिष्ट निश्चिती २) अभ्यास सवयी | १० वी | २८ |
| | ७ ते ८ मे रोहा | ३) नियोजन कौशल्य ४) अभ्यास पायऱ्या | | ५४ |
| LearnEng | १ ते २० मे दरम्यान | १) मुलांचा भाषिक, सामाजिक आणि व्यक्तिमत्त्व विकसन साधणे<br>२) विविध कौशल्ये विकसन | १० ते १३ वर्षे | १२५ |
| विकासमित्र रोहा | २६ एप्रिल ते ५ मे | १) प्रयोगातून विज्ञान आणि गणित<br>२) संवाद आणि नेतृत्व कौशल्ये<br>३) निसर्ग निरीक्षण, मुलाखत, गटकार्य<br>४) संस्कृती, कला आणि सर्जनशील विचारसरणी | ५ वी ते ९ वी | ५५४ |
| **एकूण सहभागी विद्यार्थी – १२२१** | | | | |

### मातृभूमी पूजन कार्यक्रम

रोहा तालुक्यातील कामाच्या दशकपूर्ती व श्री. स्वामी विवेकानंद जयंती निमित्ताने दि. ११ जानेवारी ते १३ जानेवारी या तीन दिवसांत मातृभूमी पूजनाचे कार्यक्रम घेण्यात आले.

**मातृभूमी पूजनाचा उद्देश** – यापुढील काळात मातृभूमी हेच आपल्या सर्वांनी दैवत मानावे हे संस्कार बालमनावर शालेय जीवनापासून बिंबविले गेले पाहिजेत. सर्वांमध्ये आपण एका देशाचे आहोत ही भावना वाढीस लागावी व भारतातील सर्व धार्मिक संप्रदायांच्या सर्व शक्तींचे एकत्रीकरण करण्यासाठी, मातृभूमी पूजन आयोजित करण्यात आले.

सहभागी शाळा – १४ महाविद्यालय – १
गाव पातळीवर – १ संस्थेत – १
एकूण ठिकाणे – १७
एकूण सहभागी संस्था – ११
एकूण सदस्य उपस्थिती – १४७८

### सुट्टीतील शिबिर – संयोजक प्रशिक्षण वर्ग

उन्हाळी शिबिर घेण्यासाठी दहावीची परीक्षा उत्तीर्ण विद्यार्थी तसेच महाविद्यालयीन युवक युवती असे एकूण ३० जणांचे प्रशिक्षण दि. १८, १९ एप्रिल रोजी श्री. विवेकानंद रिसर्च अँड ट्रेनिंग इन्स्टिट्यूट, रोहा येथे घेण्यात आले.

प्रशिक्षणात स्वयंसेवकांची भूमिका कशी असायला हवी, शिबिरात मुलांचे वर्तन कसे समजून घ्यायचे, सर्वांचा सहभाग कसा घ्यायचा याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. नवीन विज्ञान प्रयोग, सर्जनशील लेखन – गोष्ट पूर्ण करा, छोटे खेळ, पद्य सत्र घेण्यात आले. या शिबिराची एक छोटी संयोजक मार्गदर्शन पुस्तिका तयार करण्यात आली. प्रशिक्षण घेतलेल्या संयोजकांनी रोहा, तळाघर, शेणवई, कोकबन, सुडकोली, सानेगाव, विरजोली, चोरढे, चिल्हे, भालगाव या १० केंद्रांवरील ५५४ विद्यार्थ्यांसाठी शिबिरे घेतली. ३ वाडी वस्तीवरील विद्यार्थ्यांसाठी ३ ते ४ तासांचे मेळावेही घेण्यात आले. साधारण १२० विद्यार्थी या मेळाव्यात उपस्थित होते.

# १३. कार्यकर्ता प्रशिक्षण शिबिर - २०२४

दिनांक १५ मे ते १८ मे या कालावधीदरम्यान प्रथमच संपूर्ण विभागाचे प्रशिक्षण शिबिर प्रबोधिनीच्या वेल्ह्यातील प्रशिक्षण केंद्राच्या वास्तूत झाले. शिबिराचे हेतू मुख्यत्वे कौशल्य प्रशिक्षण, प्रबोधिनीचे शैक्षणिक तत्त्वज्ञान समजून घेणे, प्रक्रिया-विचार समजून घेणे, प्रबोधिनीचा इतिहास समजून घेणे व अंतर्गत गटबांधणी असे होते. कथाकथन, कार्यशाळा, व्याख्याने, गटकार्य व व्यक्तिगत वाचन-चर्चा या पद्धतीने सर्व सत्रे झाली. सर्वात महत्त्वाचे म्हणजे यावेळी शिबिराच्या शेवटच्या दिवशी प्रतिज्ञाग्रहणाचा कार्यक्रम देखील झाला. ७ जणांनी प्रथम, एकीने द्वितीय आणि साहाय्यक विभागप्रमुख श्री. अमर परांजपे यांनी तृतीय प्रतिज्ञा घेतली.

एकूण ४० ते ४५ अशा संख्येने सदस्य उपस्थित होते. विभागात नियमितपणे जबाबदारी घेऊन काम करणारे सदस्य, हराळी केंद्रावरील सदस्य, विविध ठिकाणी विज्ञानदूत अथवा शिक्षणदूत म्हणून काम करणारे सदस्य शिबिराला अपेक्षित होते.

एकूण ९ वक्त्यांनी विविध विषयांवर मार्गदर्शन केले. सत्रांची साधारण विभागणी खालीलप्रमाणे -

❊ **कौशल्य प्रशिक्षण –** संवाद कौशल्य, निर्णय कौशल्य, व्यक्तिमत्त्व अभ्यास (Transactional Analysis), अध्यापन कौशल्य

❊ **प्रबोधिनी विचार –** शैक्षणिक तत्त्वज्ञान, इतिहास-वर्तमान-भविष्य, व्यक्तिगत वाचन + चर्चा, अनुभवकथन, प्रतिज्ञाग्रहण

❊ **गटबांधणी –** पथक रचना - कामे + बैठका, सायं. खेळ, प्रकल्प मांडणी

**❊ मार्गदर्शनासाठी उपस्थित असलेले वक्ते ❊**

| | | |
|---|---|---|
| ❊ मा. संचालक | ❊ मा. कार्यवाह | ❊ मा. सुभाषराव देशपांडे |
| ❊ मा. प्रशांतसर दिवेकर | ❊ वाच. सविता कुलकर्णी | ❊ श्री. नचिकेत नित्सुरे |
| ❊ वाच. सौगंध देशमुख | ❊ डॉ. दीपक गुप्ते | ❊ श्रीमती संस्कृती बापट |

# १४. पालक साहाय्यक गट

प्रौढ युवती गटाला ज्ञान प्रबोधिनीच्या प्रशालेतर विभागांची ओळख व्हावी या हेतूने जुलैमध्ये शैक्षणिक उपक्रम संशोधिकेचे ओळखसत्र झाले. विभागात सुरू असणारे प्रकल्प, त्यातील उपक्रम आणि त्यांचा हेतू अगदी सोप्या, सहजपणे मांडले. ठरलेल्या जबाबदाऱ्या सांभाळून यातील उपक्रमात सहभागी होण्याची इच्छा अनेक युवतींनी व्यक्त केली. गटात प्रबोधिनीच्या पालक व इतर युवतीही होत्या. विभागातील व युवती गटातील प्रत्येकी एक सदस्य यांच्या समन्वयातून इच्छुक युवतींची नोंदणी व सहभागासाठी बैठका झाल्या. विभागातील प्रकल्प प्रमुखांकडून अपेक्षित सहभागाचे तपशील युवती गटाला सांगणे व यात गरजेनुसार युवतीने सहभाग घेणे अशी रचना केली.युवतींनी मासिक बैठकीत सहभागी असलेल्या कामाचे अनुभव मनापासून, खुलवून सांगितले. गटाची स्फूर्ती व प्रोत्साहन यातूनच वाढत गेली. या बैठकीमध्ये प्रत्येक प्रकल्प प्रमुखांनी वेळोवेळी विविध उपक्रमांची अधिक माहिती दिली. ही मिळणारी सविस्तर माहिती, कामाची पूर्वतयारी व त्याचे मार्गदर्शन व प्रशिक्षण यामुळे गटाची बांधणी खूप छान झाली. थोड्याच दिवसात ७/८ जणींचा हा गट ४० जणीपर्यंत पोचला. शहरी, ग्रामीण, आदिवासी निवासी शाळा अशा समाजातील अनेक स्तरावर काम करत असलेल्या या विभागाच्या उपक्रमाचा या युवती एक महत्त्वाचा भाग झाल्या. मुलांकडून पणती रंगवून घेणे, छोटे सायंटिस्ट्सचे संच बनविणे, पेपर तपासणे, रोहा पडसरे येथे शिबिर घेणे, ऑनलाईन काम, गणित प्रभुत्व परीक्षेत पर्यवेक्षण, २-३ तासाच्या कामापासून ते निवासी शिबिरांमध्ये अशा अनेक कामात हा गट सक्रिय सहभागी होता. उपक्रमातील युवतींचा अनुभव समाधान, आनंद, उत्साह देणारा होताच पण विभागातून मिळणाऱ्या प्रोत्साहनामुळे एक सकारात्मक ऊर्जा देणाराही होता. शैक्षणिक उपक्रम संशोधिकेची त्या नावाची ओळख ते याच विभागाचा साहाय्यक गट हा प्रवास प्रौढ युवतींना फारच छान अनुभव देऊन गेला. पुढेही अशा अनेक उपक्रमात सहभागी होत राहण्याची पूर्ण गटाची इच्छा आहे.


### मनोगत

वार्षिक अहवालाचा अनुवाद केल्यावर वेगळं काम पूर्ण केल्याचं समाधान नक्कीच मिळालं. भविष्यात अमराठी लोकांना या प्रकल्पाशी जोडून घेणाऱ्या या कामात खारीचा वाटा घेतला. यामुळे महाराष्ट्राबाहेरही हे काम पोहोचणं सोपं होईल याचा जास्त आनंद झाला.

गणित प्रभुत्वच्या पर्यवेक्षणाचा अनुभव माझ्यासाठी अविस्मरणीय आहे.

विद्यार्थ्यांचा उत्साह, वैज्ञानिक, चिकित्सक दृष्टिकोन, पालक आणि शिक्षकांची उत्सुकता, नवनिर्मितीचा आनंद हे अनुभवता आले याने आनंद द्विगुणित झाला.

१५ ऑगस्ट - अनुभव शाळा येथील सहभागामुळे विभागाशी जोडले गेल्याचा आम्हा सर्वांना अभिमान आहे.



सहभागी विद्यार्थी संख्या
१,३८,०७५
महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांमध्ये शैक्षणिक
उपक्रमांचा विस्तार










भारतातील विविध राज्यांमध्ये शैक्षणिक
उपक्रमांचा विस्तार.
सहभागी विद्यार्थी संख्या
४७, ५५१





विकासमित्र, रोहा - वाचन कौशल्य कार्यशाळा



छोटे सायंटिस्टस् - शिक्षक प्रशिक्षण, आसाम



१० वी स्वयं - अध्ययन कार्यशाळा



प्रज्ञा विकास - क्षेत्र भेट: आगाखान पॅलेस



शैक्षणिक उपक्रम संशोधिका गट



अनुभव शाळा - हस्तकला: विद्यार्थी राखी बनवताना



प्रज्ञा विकास - गणपती बनविणे कार्यशाळा



छोटे सायंटिस्टस् - दाब संकल्पना विद्यार्थ्यांना समजावून सांगताना



प्रज्ञा विकास - नेतृत्व विकसन गट कार्यशाळा



विकासमित्र - ५ वी शैक्षणिक सहल

संकेतस्थळ | इंस्टाग्राम | फेसबुक | युट्यूब


शैक्षणिक उपक्रम संशोधिका

पत्ता: ५१०, ज्ञान प्रबोधिनी, सदाशिव पेठ, पुणे- ४११०३०

दूरभाष: ०२०- २४२०७२०९ / ९०२२४ ७६१४६

https://earc.jnanaprabodhini.org